cmyk

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..! -संपादक

# दै. राज्य लोकतंत्र

जागतिक महिला दिन

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३१४ | शनिवार, दि.८ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# बळीराजाला मोफत वीज:१४ लाख कृषी पंपधारकांना होणार फायदा

## • राज्यातील नागरिक विजबील मुक्त होणार-मुख्यमंत्री

**मुंबई | प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या बळीराजा मोफत वीज योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देखील मोठा दिलासा मिळणार आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, बळीराजा मोफत वीज योजना लागू करण्यात आली असून याचा फायदा तब्बल ४५ लाख कृषी पंपधारकांना होणार आहे. या योजनेसाठी सरकारने १४ हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. यामध्ये शासनाच्या सबसिडीची ५,५०० कोटींची बचत होणार आहे आणि एकूण वीज खरेदी खर्चात १० हजार कोटी रुपयांची बचत या माध्यमातून होणार आहे. या योजनेमुळे कार्बन उत्सर्जनात २५ टक्क्यांची कपात होणार आहे. मुख्यमंत्री कृषी वाहिनी प्रकल्पाअंतर्गत, २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना संपूर्ण सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असून विजेच्या किमतीत मोठी कपात होईल.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी योजना जाहीर करण्यात आली असून, यातून लाखो वीज ग्राहकांना वीज बिलमुक्ती मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन वीज धोरणांतर्गत स्मार्ट मीटर बसवणाऱ्या ग्राहकांना व जे दिवसा वीज वापरतील त्यांना १० टक्के वीज दरात सवलत दिली जाणार आहे. हे ग्राहक आपल्या विजेच्या वापरावर अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण ठेवू शकतील आणि यामुळे राज्याच्या ऊर्जा बचतीला हातभार लागेल. जी वीज आपल्याला ८ रुपयांना पडत होती ती आता केवळ ३ रुपयांना



पडणार आहे, म्हणजे यूनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत. याचा जवळपास ७० टक्के ग्राहकांना थेट फायदा होणार असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील ७० टक्के ग्राहक हे ० ते १०० युनिट वीज वापरणारे आहेत. सरकारच्या नव्या योजनेनुसार, या ग्राहकांना सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत वीज मोफत मिळणार आहे. सोलर पॅनल बसवण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे, ज्यामुळे दीड कोटी ग्राहकांना विजेबिलाचा भार सहन करावा लागणार नाही.

# ज्ञानराधाच्या आरोपींना अर्थिक गुन्हे शाखेकडून आटक

**बीड | प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बोड या वित्तीय संस्थेच्या बीड जिल्हयात एकुण २३ शाखा असून सदर मल्टीस्टेटचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ व अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द बीड जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये आजपावेतो ७४ गुन्हेदाखल झालेले असुन सदर ७४ गुन्हयाचे फिर्यादी मधील एकूण रक्कम ४८,५१,७२,०२३ रुपयाचा अपहार झाल्याचे तक्रारीमध्ये नमुद आहे तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटो ली. बीड मध्ये ठेवी ठेवलेल्या ठेवीदारापैकी ११,२११ ठेवीदारांनी त्यांचे ठेवोबाबत अर्ज व कागदपत्रे दिलेली असुन अर्जमध्ये अपहार झालेली रक्कम ६३६,२६,९१,४७५/- रुपये रकमेचा विश्वासघात व फसवणुक झालेबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहे त्यावरुन गुन्हयाचे तक्रारीमधील व प्राप्त ठेवोदार यांचे अर्ज असे एकूण ६८४, ७८,६३,४८०/-रु रकमेची फसवणुक झालेबाबत माहीती प्राप्त झालेलो आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठेवीदार यांचे तक्रारी अर्ज स्वीकारण्यासाठी आर्थीक गुन्हे शाखा बोड येथे एक स्वतंत्र पथक तयार करण्यात आलेले आहे.

पान २ वर

# पाणीपुरवठा योजनेची बिले रखडल्याने कंत्राटदार हवालदिल

**बीड | प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच गावांना पाणीपुरवठा विभागाच्या वतीने वीर पाईपलाईन व नळ जोडणी योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. यातील बऱ्याच गावची कामे पूर्णत्वास गेली आहेत. तर काही कामे ५०% पर्यंत गेली आहेत. या कामाची देयके जिल्हा परिषदेमध्ये प्रलंबित असून तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या सहीने मंजूर झालेल्या बिलाची चाळीस कोटीची देयके अद्याप प्रलंबित आहेत. मात्र शासनाकडून यासाठी फक्त १४ कोटी रुपये आल्याने कंत्राटदार हवालदिल झाले आहेत.**




केंद्र सरकारच्या वतीने राज्यातील सर्व जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यात आली. बीड जिल्ह्यामध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी सर्वच गावांना ही योजना मंजूर केली. अनेक गावात योजनेचे कामही सुरू झाले आणि ते पूर्णत्वास गेले .मात्र देयके अद्याप प्रलंबित आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या काळातील मंजूर करण्यात आलेली चाळीस कोटीची बिले थकीत होती. यासाठी केंद्राकडून निधी उपलब्ध होणे गरजेचे होते. मात्र केंद्र शासनाने केवळ १४ कोटी रुपये दिल्याने हे पैसे

पान २ वर

## उबाठा सेनेला आणखी एक धक्का

गडचिरोली : आरमोरी क्षेत्राचे सलग दोनवेळा विधानसभेत प्रतिनिधित्व करणारे माजी आमदार डॉ. रामकृष्ण मडावी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जय महाराष्ट्र करुन ७ मार्च रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश केला. डॉ. मडावी हे १९९५ मध्ये पहिल्यांदा शिवसेनेकडून विधानसभेत पोहोचले. १९९९ मध्येही त्यांनी विधानसभा गाठली. २००४ मध्ये त्यांचा हॅटट्रिकच्या उंबरठ्यावर पराभव झाला. दरम्यान, शिवसेना दुभंगल्यानंतर त्यांनी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची साथ दिली होती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेकडून त्यांना उमेदवारी जाहीर झाली होती, पण त्यांनी निवडणूक न लढविता उध्दवसेनेतच राहणे पसंद केले होते. अलीकडेच पक्षाने त्यांना जिल्हा समन्वयकपदाची जबाबदारी दिली होती. पक्षात दुय्यम पद दिल्याची सल त्यांना होती, यातून त्यांनी उध्दवसेनेसोबतचे नाते तोडून राष्ट्रवादीसोबत नवा प्रवास सुरु केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# महिला दिनानिमित्त सरकारचं अनोखं पाऊल

## उद्या राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्राम सभा

**मुंबई | प्रतिनिधी**

**'महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबवणे महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहेत,'' अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.**



मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, ''या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबवल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या विशेष ग्रामसभेमध्ये स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि नागरिकांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढाकार घ्यावा,'' असं आवाहन मंत्री तटकरे यांनी केलं आहे.

पान २ वर

# तहसीलदार प्रतिभा गोरे हल्ला प्रकरणी बारा जनाविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना | प्रतिनिधी**

**वाळू माफियांनी परतुर तहसीलदार प्रतिभा गोरे यांच्यावर गंभीर जीवघेणे हल्ला केल्याप्रकरणी बारा जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच या प्रकरणी कांही माफीयांना तडीपार केले असून तर काहींना स्थानबद्ध केलं आहे .असे असतानाही वाळू माफियांची मस्ती जिराणा या माफीयांची मुजोरी अजून संपलेली नाही. त्यामुळे रात्री दोन वाजेच्या सुमारास परतूरच्या तहसीलदार प्रतिभा पांडुरंग गोरे यांच्यावर मुरूम चोरट्यांनी हल्ला केला .त्यामुळे आता महसूल प्रशासन खडबडून जागे झाले आहे आणि मिळालेल्या माहितीनुसार पुढील महिन्यांमध्ये एक महिन्यांमध्ये १८ केसेस करण्याचे ''टार्गेट'' महसूल विभागाने घेतले असल्याचे समजते.**

जालना जिल्ह्यातील वाळू चोरी ही राज्यभरात चर्चेचा विषय झाल्यानंतर जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले आणि या माफियांवर कार्यवाही देखील झाली. दरम्यानच्या काळात अनेकांना आपले जीवही गमवावे लागले. त्यामुळे महसूल आणि पोलीस प्रशासन यांनी कंबर कसून माफियांवर कारवाई केली. हद्दपार केलं, आणि अजूनही कारवाई चालूच आहे. याच कारवाईचा एक भाग म्हणून परतूरच्या तहसीलदार प्रतिभा मोरे या रात्री दीड वाजेच्या सुमारास गौण खनिज संपत्तीची पाहणी करण्यासाठी परतूर परिसरात आपल्या खाजगी वाहनातून बाहेर पडल्या. आंबा ते परतुर रस्त्याच्या दरम्यान एका ठिकाणी त्यांना जेसीबीच्या माध्यमातून हायवा मध्ये मुरूम भरताना काही लोक दिसले. त्यावेळी या ठिकाणी त्या गेल्या असता या खनिज संपत्तीची चोरी सुरू होती. त्यावेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना तिथे बोलावले

पान २ वर

# याच अधिवेशनात मराठा समाजाच्या मागण्या मान्य करा ;अन्यथा आंदोलन

**छ. संभाजीनगर | प्रतिनिधी**

**राज्य विधानसभेच्या चालू अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न सरकारने मार्गी लावावा, शिवाय अन्य मागण्याही तातडीने पूर्ण कराव्यात अन्यथा आंदोलन करावे लागेल, असा इशारा मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवार दि. ७ मार्च रोजी येथे पत्रकार परिषदेत राज्य सरकारला दिला. मराठा समाजातील आमदार, खासदारांनीही याविषयी अधिवेशनात आवाज उठवावा, अन्यथा गावांत आल्यावर समाज तुम्हाला प्रश्न विचारल्याशिवाय राहणार नाही असे त्यांनी यावेळी नमूद केले.**



मनोज जरांगे म्हणाले की, मराठा आणि कुणबी एकच जात असल्याचे अनेक पुरावे आहेत. यामुळे मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात यावे, सगे सोय-याचे अध्यादेश काढून एक वर्ष झाले. या अधिसूचनेची अंमलबजाणी याच अधिवेशनात करावी, अशी मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. मराठा आरक्षण लढ्यातील आंदोलकांवरील गुन्हे परत घेण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र आज पावणे दोन वर्ष झाले तरी गुन्हे परत घेतले नाही. आत्मबलिदान दिलेल्या तरुणांच्या नातलगांना नोकरी आणि आर्थिक मदत देण्याचा शब्द अद्याप पाळला नाही. न्यायमूर्ती शिंदे समितीने अद्याप काम सुरू

पान २ वर

# लाचखोर महिला तलाठी गळाला

**धाराशिव | प्रतिनिधी**

**वडिलांच्या नावे असलेल्या जमिनीचा फेर घेण्यासाठी केलेला अर्ज मंडळ अधिका-यांकडे पाठविण्यासाठी महिला तलाठ्याने शेतक-याला ८ हजार रूपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ३ हजार ५०० रूपये स्विकारत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने महिला तलाठ्यास रंगेहाथ पकडले. ही कारवाई उमरगा तालुक्यातील पेठसांगवी येथे करण्यात आली.**

उमरगा तालुक्यातील पेठसांगवी सज्जाच्या तलाठी म्हणून आश्विनी बालाजी देवनाळे (वय ३५) या कार्यरत आहेत. सदर तलाठी देवनाळे यांनी तक्रारदार त्यांच्या वडिलांचे नावे असलेली जमीन त्यांचे नावे फेर घेण्याकरीता यातील महिला तलाठी यांच्याकडे अर्ज केला होता. तक्रारदार यांच्या अर्जावरून नोटीस काढून फेर घेण्याचा अर्ज मंडळ अधिकारी यांच्याकडे पाठविण्याकरीता तलाठी देवनाळे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ८ हजार रूपये लाचेची मागणी केली होती. मात्र तडजोडी अंती ३ हजार ५०० रूपये लाच स्विकारण्याचे मान्य केले. याबाबत तक्रारदार यांनी ५ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशीव येथे दूरध्वनीवर संपर्क साधुन तक्रार दिली होती. त्यानुसार ६ मार्च रोजी पेठसांगवी (ता. उमरगा) येथे तलाठी कार्यालयात पडताळणी केली असता आरोपीने पंचासमक्ष ८ हजार रूपयांची मागणी करून तडजोडी अंती ३ हजार ५०० रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. सदरची लाच रक्कम तलाठी देवनाळे यांनी पंचासमक्ष स्वत: स्विकारली.

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.७ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३५.०० क्विंटल | २,५९७ | ३,०५१ | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड: १५०.५० क्विंटल | २,००० | ३,६०० | २,६३७ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :६.५० क्विंटल | ७,१०० | ७,२०० | ७,१५० |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: २७.०० क्विंटल | २,०१० | ३,०५१ | २,७१२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ५७.०० क्विंटल | ३,९८० | ४,००१ | ३,९९३ |
| हरभरा: २४.५० क्विंटल | ५,१०० | ५,२०० | ५,१७५ |

# शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर जमिनीस प्रशासकीय मान्यता द्यावी

## वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांच्या सूचना

**बीड | प्रतिनिधी**

**शेतकरी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात गायरान जमिनीवर जाळा लागवडीसाठी हजार हेक्टर वर आहे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशा सूचना स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ऍड.निलेश हेलोंडे पाटील यांनी एका बैठकीत दिल्या. आपल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात या बैठकीत बीड तालुक्यातील पिंपळवाडी मधील मयत शेतकरी दादाराव बहिरवाळ यांच्या वारसांना त्यांनी यावेळी भेट दिली.**




सर्व शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कंपनी व प्रतिनिधीचे नाव आणि मोबाईल प्रत्येक ग्रामपंचायतीत फ्लेक्स द्वारे लावावा अशी सूचना त्यांनी या बैठकीत केली. विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची शासनाने नियुक्ती केलेली आहे. या अनुषंगाने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मिशनसंबंधी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधिकारी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीत अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले.

उपजिल्हाधिकारी रोहयो, बीड यांनी गायरान जमिनीवर चारा लागवड करणेकामी १००० हेक्टरवर लागवड करण्यासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रं. ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यासाठी जिल्हयातील सर्व १०६५ ग्रामपंचायतींमध्ये प्रतिनिधींची नावे / सूचना डिजिटल फ्लेक्स स्वरुपात लावावेत.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी शेतीच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करण्यासाठी मौ. खामगाव ता. गेवराई व डिघोळअंबा ता. अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी १० कॅम्प आयोजित करुन ५०० मास्टर ट्रेनर्स तयार करावेत.प्रेरणा प्रकल्पांतर्गत आरोग्य कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. व आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे कुटुंबियांना भेटी देण्यात याव्यात. व त्यांचे मानसिक स्वास्थ्याची काळजी घेणेबाबत निर्देश दिले. सर्व कृषी उत्पन्न बाजार समितींच्या व सर्व ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डवर शेतीमालाचा भावफलक लावण्यात यावा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी शेतीमालाच्या आधारभूत किंमती बाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.सहआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभाग, बीड यांनी त्यांच्या विभागाच्या योजना तरुणाईला माहिती नसल्याने पुरेशी प्रसिध्दीद्वारे माहिती करुन

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सुसाट रस्ते, सुसाट बळी!

लातूर-नांदेड या राष्ट्रीय महामार्गावरील नांदगावपाटीजवळ सोमवारी (३ मार्च) झालेल्या बस अपघातात ४१ प्रवासी जखमी झाले. त्यातील ६ प्रवाशांना गंभीर दुखापत झाली. दुपारी पावणे दोनच्या सुमारास एका दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात बसचालकाचा बसवरील ताबा सुटला आणि बस दुभाजकावरून पलिकडच्या लेनवर उलटली आणि ७० फूट फरफटत गेली. राष्ट्रीय महामार्ग झाल्यापासून चाकूर तालुक्यातील आष्टा मोड आणि नांदगाव पाटी हे स्पॉट अपघाताचे डेंजर झोन म्हणून ओळखले जात आहेत. अहमदपूर आगाराची अहमदपूर-लातूर ही बस लातूरकडे निघाली होती. नांदगावपाटीजवळील रस्ता दुभाजकाजवळ बस आली तेव्हा एक दुचाकीस्वार रस्ता ओलांडताना दिसला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात बसचालकाने बस दुभाजकातून उजव्या बाजूच्या रस्त्यावर नेली.

त्यावेळी दुभाजकावर एक चाक गेल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावर पलटी झाली. सुदैवाने या अपघातात प्राणहानी झाली नसली तरी अनेकांच्या डोक्याला, छातीला मार लागला असून एकाचा हात निखळला आहे तर दोघांच्या हाताची बोटे तुटली आहेत. देशात चांगले गुळगुळीत रस्ते होत आहेत. देशात महामार्गाचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. त्याचे स्वागत केलेच पाहिजे. या रस्त्यांच्या निमित्ताने त्या-त्या गावांचा विकास होत असतो आणि विकासाच्या माध्यमातून रोजगारही निर्माण होतो. परंतु रोजगाराची निर्मिती होत असताना दुसरीकडे वाढत जाणा-या रस्ते अपघातांची संख्या बघितली तर या अपघातांमुळे किती प्रचंड प्रमाणात मनुष्यहानी होत आहे याची आपण कल्पनाही करू शकत नाही. गत दहा वर्षांत सुमारे दोन कोटी लोकांचा बळी गेल्याचा प्राथमिक अंदाज आहे. देशात इतक्या मोठ्या प्रमाणावर माणसांचा केवळ रस्ते अपघातात बळी जात असेल तर ती अतिशय चिंतेची बाब म्हणावी लागेल.

जगात आतापर्यंत अनेक मोठी युद्धे झाली, त्यात लाखो लोकांचे बळी गेले परंतु कोणत्याही प्रकारचे युद्ध न करता भारतात दरवर्षी दीड लाख आणि दशकभरात दीड-दोन कोटी लोकांचे जीव अपघातांमध्ये जात असतील तर त्यावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. एकीकडे मोठमोठ्या रस्त्यांची निर्मिती होते आहे. दररोज ३० किलोमीटरचे रस्ते बांधण्याचा विक्रम होतो आहे पण त्याबरोबरच दररोज जर तीन हजार लोकांचे बळी जात असतील तर या रस्ते बांधणीचा वेग आणि मनुष्यबळी जाण्याचा वेग हा सारखाच किंवा समप्रमाणात आहे असे म्हणावे लागेल. रस्त्यांची जर इतक्या मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत असेल तर मनुष्यांचे बळी जाण्याचे प्रमाणही कमी झाले पाहिजे कारण अनेक सुविधा देणारे सुखदायी रस्ते तयार झाले आहेत. अपघातांचे प्रमाण कमी झाले पाहिजे परंतु दुर्दैवाने तसे चित्र पहावयास मिळत नाही. उलट अपघातांची संख्या वाढत आहे. रस्ते आधुनिक होण्याचे प्रमाण वाढत असताना त्यातला सर्वांत मोठा विरोधाभास असा की, रस्ते वाढत आहेत आणि अपघातही वाढत आहेत! खराब रस्त्यांमुळे अपघात होणे किंवा अपघातांचे प्रमाण वाढणे साहजिक आहे परंतु सुंदर रस्ते तयार होऊनही अपघात वाढत असतील तर त्याला काय म्हणावे? अर्थात याला मनुष्य स्वभावही कारणीभूत आहे. वाहनचालकांचे बेदरकार वाहन चालवणे, रहदारीचे नियम न पाळणे, वेगावर नियंत्रण न ठेवणे, बेशिस्त पादचारी आदी कारणे अपघातांचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत ठरत आहेत. अन्य देशांचा आदर्श समोर ठेवूनच आपल्या देशातही रस्तेबांधणी करण्यात आली आहे. अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते आधुनिक करण्याचा प्रयत्न होतो आहे. म्हणजे सर्व प्रकारची आधुनिकता येऊनही रस्ते अपघातांचे प्रमाण कमी होत नसेल तर या रस्त्यांच्या निर्मितीचा किंवा वेगाचा नेमका कोणता उद्देश साध्य होतो आहे यावर गंभीरपणे विचार करावा लागेल. कारण रस्तेनिर्मिती करताना केवळ दळणवळणाचा वेग वाढणे एवढाच मर्यादित उद्देश ठेवून चालणार नाही. सुंदर सुखदायी रस्ते तयार झाल्याने कमी वेळेत मोठा पल्ला गाठता येतो, वाहनकोंडी कमी होते, त्यातून पेट्रोल, डिझेल वाचते, इंधन बचत होते. रस्त्यांची निर्मिती आणि पर्यायाने रोजगारनिर्मिती होत असताना रस्ते अपघात टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जात नसतील तर मग विकासाचा आणि मनुष्यहानी टाळण्याच्या प्रयत्नांचा कोणताच ताळमेळ बसत नाही हे लक्षात घ्यावे लागेल. पायाभूत सुविधांच्या नावाखाली सरकार दरवर्षी सुमारे १२ लाख कोटी रुपये रस्ते विकासावर खर्च करते. रस्ते विकास करताना रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यालाही तितकेच प्राधान्य द्यायला हवे. अनेक ठिकाणी चौपदरी, सहा पदरी, आठ पदरी रस्ते तयार झालेले दिसतात. या रस्त्यांवर ५० ते १५० कि.मी. अंतरावर एकही रुग्णालय, प्राथमिक उपचार केंद्र, ॲम्ब्युलन्स नसेल तर रस्ते विकासाचा मूळ उद्देश काय असा प्रश्न निर्माण होतो.

केवळ वाहने सुसाट धावण्यासाठी या रस्त्यांची निर्मिती आहे का? रस्ते चांगले झाल्यामुळे वाहने सुसाट धावतात, कमी वेळेत इच्छित स्थळ गाठतात हे खरे आहे. परंतु सुसाट जीवही जात आहेत ते कसे रोखणार? भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्येच्या देशात रस्ते अपघातात सर्वाधिक बळी जात आहेत. भारतातल्या लोकसंख्येचा एक चांगली मनुष्यशक्ती म्हणून प्रधानसेवक कौतुक करत असतात. ही मनुष्यशक्ती म्हणजे एक मोठे भांडवल आहे असेही ते म्हणतात. परंतु ही मनुष्यशक्ती वाचवण्यासाठी ते कोणते प्रयत्न करत आहेत ते मात्र सांगत नाहीत! रस्ते अपघात कमी होत नसल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गतवर्षी संसदेत माफी मागितली होती. अपघातांची संख्या कमी करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज असल्याचे ते म्हणाले होते. रस्ते अपघातातील जखमींवर कॅशलेस उपचार योजनेची घोषणाही त्यांनी केली होती. रस्ते अपघातात जखमींना मदत करणा-यांना २५ हजार रुपयांचे बक्षीसही त्यांनी जाहीर केले होते. अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिस अधिकारी वाहनचालकांवर कडक कारवाई करतात परंतु अपघातांना कारणीभूत ठरणारी रस्त्यावरील परिस्थिती मात्र सर्वांकडून दुर्लक्षित राहते. काही अपघात हे वाहनचालकाच्या चुकीमुळे होतात तर काही अपघात हे दुस-याच्या चुकीमुळे घडतात. नांदगाव पाटीजवळ झालेला बस अपघात हा दुचाकीस्वाराच्या चुकीच्या यूटर्नमुळे झाल्याचे दिसून येते. म्हणजे त्या दुचाकीस्वाराची चूक बसमधील ४० जणांना भोगावी लागली. म्हणजेच वाहन चालवताना किती सतर्क राहायला हवे याची कल्पना या अपघाताच्या व्हीडीओवरून लक्षात येऊ शकते.

## राज्यातील जिल्हा रुग्णालयांत केमोथेरपीची सुविधा मिळणार

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यासह देशामध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. कर्करुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता चांगल्या प्रकारची उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावरील केमोथेरपी उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असं सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विधानसभेत विभागावरील पुरवणी मागण्यांच्या चर्चेला उत्तर देताना स्पष्ट केलं आहे.**

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणार आहेत. त्याचबरोबर कंत्राटी स्वरूपातील वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्यासाठी जिल्हा पातळीवर अधिकार देण्यात आले आहेत. राज्यात कर्क रुग्णालयांची मागणी लक्षात घेता याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यामध्ये कर्क रुग्णालय उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत रुग्णालय सूचीबद्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. दरम्यान, कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू तसेच माता मृत्यू थांबवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग व महिला आणि बाल विकास विभाग समन्वयाने काम करेल. राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करून रुग्णांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.

## जालन्यात दोन महिला चालवतात डॉग ट्रेनिंग सेंटर

**जालना । प्रतिनिधी**

**स्त्रियांनी जवळपास प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवलेला आहे. अशाच एका अनोख्या आणि पुरुषप्रधान क्षेत्रात आपला ठसा फक्त गाय किंवा राज्यापुरता न उमटवता देशस्तरावर उमटवणाऱ्या दोन महिला मृगनयनी राजे व गितांजली देशमुख हया फरलव्ह पेट रिसॉर्ट व डॉग ट्रेनिंग सेंटर चालवत आहेत.**



जालना येथील देऊळगावराजा रोड, धावेडी येथे फरलव्ह डॉग ट्रेनिंग सेंटर हे मराठवाडयातील सर्वात मोठे श्यानकेंद्र असून येथे श्वानांचे ट्रेनिंग, वोर्डीग व ग्रुमिंग केले जाते. हयाच सोबत येथे पेटींग झू देखील आहे. शालेय सहली, मुलांचे वाढदिवस विविध फेस्टीवल इव्हेंट आणि बरेच काही येथे आयोजित करण्यात येतात. येथे सर्व प्रजातींच्या व विविध वयोगटातील श्वानांना प्रशिक्षण दिले जाते. एक एकरात विस्तारलेल्या निसर्गरम्य परिसरात फरलव्ह येथे इनडोअर व आऊटडोअर वेनल, डॉगपार्क, प्ले एरिया अशा विविध सुविधा येथे उपलब्ध आहेत. येथे प्रशिक्षण झालेल्या बेल्झीयन, मॅलिनॉईस प्रजातीच्या अकिरा नामक श्वानांने नामांकित – ही स्पर्धा जिंकून मराठवाड्यातील पहिला प्रोटेक्शन डॉग होण्याचा मान मिळविला आहे. चुकीच्या समजुतीमधुन आक्रमक झालेले श्वान जसे रॉटव्हिलर, जर्मन शेफर्ड यासारख्या प्रजातीच्या श्वानांना देखील येथे महिला प्रशिक्षण ट्रेन करतात, जेणे करुन त्या श्वानांचे व त्यांच्या मालकांचे पुढील आयुष्य सोपे व सुखकर व्हावे. फरलव्ह येथे श्वान प्रशिक्षण हे पुर्णपणे सकारात्मक व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्विकारल्या गेलेल्या पध्दतीने केले जाते. श्वानांच्या प्रशिक्षणांसोबतच त्यांच्या मालकांना देखील श्यान हाताळायचे प्रशिक्षण दिले जाते. व त्यांना मार्गदर्शन केले जाते. ज्यामुळे फरलव्ह येथे संपूर्ण महाराष्ट्रातून श्वानप्रेमींचा वाढता कल दिसून येतो. फरलव्ह येथील प्रशिक्षीत थेरपी डॉग्ज हे येथे येणाऱ्या प्रत्येकांसाठी खास आकर्षण ठरतात. फरलव्हच्या दोन्ही डायरेक्टर अतिशय जिद्दीने व कर्तव्य तत्परतेने हा कठीण समजला जाणारा व्यवसाय (जॉब) पार पाडत आहेत. त्यांच्या हया प्राणीप्रेमासाठी खुप शुभेच्छा वैज्ञानिक अभ्यास सांगतो की, श्वानांसोबत तसेच इतर पाळीव प्राण्यांसोबत वेळ घालवल्याने आपले शारीरीक, भावनिक व मानसीक स्वास्थ सुधारते, तेव्हा तुम्ही कधी येताय फरलव्हला भेट द्यायला?



## सात्रा शाळेत विज्ञान प्रदर्शन बक्षीस वितरण

**कळंब । प्रतिनिधी**

**तालुक्यातील सात्रा गावच्या जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शाळा स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.या विज्ञान प्रदर्शनात सादर ३६ वैज्ञानिक प्रयोग सादर करण्यात आले.**

या सर्व प्रयोगांत कु सिद्धी सागर चिंचकर हिच्या प्रयोगास प्रथम,कु समिक्षा नानासाहेब वाघमारे हिच्या प्रयोगास द्वितीय तर कु प्रिया धम्मपाल वाघमारे व नैतिक सुधाकर वाघमारे यांच्या प्रयोगास तृतीय क्रमांक मिळाला. बक्षीस विजेत्या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अमोलराव थोरबोले, उपाध्यक्ष श्री सागरराव चिंचकर,शाळेचे मुख्याध्यापक श्री दिपक कसबे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. विज्ञान प्रदर्शनात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान शिक्षक राजेंद्र पवार,शिक्षिका श्रीमती इंदू वाघमारे व श्रीमती सुरेखा चोभारकर यांनी परिश्रम घेतले.

# सक्षम पिढी घडविण्याचे काम महिलांच्या हाती-खा. कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी**

**आज शासनाच्या विविध विभागात महिला काम करत आहेत. महिला दिनी महिलांनी आपल्या कामात आलेले अनुभव, सचोटी आणि बारकावे कथन करावेत. स्त्री शिवाय पुरुष कधीही सर्वगुण संपन्न होवू शकत नाही. स्त्री शक्ती आपल्या आजुबाजुला असल्यानेच आपले नियोजन व्यवस्थितपणे पार पडते. बालकांना सांभाळण्याचे काम महिला अत्यंत उत्कृष्टपणे करत असतात. तरी नवीन सक्षम व संस्कारक्षम पिढी घडविण्याचे काम महिलांच्या हाती आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात जागतिक महिला दिन व बेटी बचाओ बेटी पढाओ उपक्रम दशकपुर्ती सोहळ्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजु सोळुंके, तहसीलदार छाया पवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे यांची उपस्थिती होती. खासदार डॉ.काळे म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्य चळवळीसह स्वातंत्र्योत्तर काळात महिलांचे अमुल्य योगदान आहे. जालना जिल्ह्यातील मराठवाडा मुक्ती संग्रामातील थोर स्वातंत्र्यसेनानी दगडाबाई शेळके यांनी आपले लग्न बाजुला ठेवून निजामाच्या फौजेला मोठ्या शौर्याने सामोरे गेल्या असल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली. तसेच शासनामध्ये गावपातळीवर उल्लेखनीय काम करणाऱ्या



अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा सेविका यांच्या कार्याचे कौतूकही त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, नारी शक्ती ही खरी शक्ती असते. कुठल्याही क्षेत्रात महिलांना संधी दिल्यास त्या पुरुषांपेक्षा जास्तीचे काम करताना दिसुन येतील. जालना जिल्ह्यातील महिला घराबाहेर पडून प्रत्येक क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करत आहेत. महिलांना पुर्वीच्या तुलनेत आता जास्त संधी मिळण्याची दारे खुली झाली आहेत. महिला सर्वच क्षेत्रात पुढे जात आहेत. स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर समतोल राखण्यासाठी महिलांची भूमिका महत्वाची ठरणारी आहे. असे सांगून जालना जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणासाठी उमेदच्या माध्यमातून नवीन छोटे-मोठे उद्योग सुरु करण्याचा प्रयत्न करु, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांनी तर सुत्रसंचालन नूतन मघाडे यांनी केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### ज्ञानराधाच्या आरोपींना

ज्ञानराधा मल्टोस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बीड मधील तपासामध्ये निष्पन्न आरोपी नामे अमोल शिवाजी परसकर हा बोड शहरात येत असलेबाबत गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहीतीवरुन विश्वांबर गोल्डे पोलीस उपाधीक्षक आर्थीक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी रत्नाकर, सहा. पोउपी मच्छीद्र-११६०, पोह. विठठल-१३४३ पोलीस अंमलदार संजय- २२९२ यांचे एक पथक तयार करुन सापळा कारवाई करुन आरोपी नामे अमोल शिवाजी परसकर यास ताब्यात घेवून दिनांक १५/०२/२०२५ रोजी १०:२५ वा अटक करण्यात आली, सदर आरोपीचा १४ दिवस मा. न्यायालयाकडून पी. सी. आर. प्राप्त करुन तपास करण्यात आला, ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी लो. बीड मधील चे विविध गुन्हयामध्ये फरार आरोपी नामे अर्चना सुरेश कुटे यांचंबाबत अटक आरोपीकडून माहीती घेवून सदर आरोपीचा शोध घेणेसाठी आर्थिक गुन्हे शाखा येथील अधिकारी, अंमलदार यांची वेगवेगळे पथके तयार करण्यात आलेली असून, सदर पथके आरोपीच्या मागावर असुन पुणे, सोलापुर व इतरत्र ठीकाणी जावुन आरोपी अर्चना सुरेश कुटे व इतर आरेपीतांचा शोध घेत आहेत सदर आरोपी अटकेबाबतची कामगीरी मा. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छ. संभाजीनगर परीक्षेत्र, मा. नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड मा. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, विश्वांबर गोल्डे उविपोअ बीड तथा पोलीस उपाधीक्षक आर्थीक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोनी संतोष, सहा. पोलीस निरीक्षक रत्नाकर, सहा. पोउपी मच्छींद्र ११६०, पोह. विठठल-१३४३ पोलीस अंमलदार संजय- २२९२ तसेच टेक्नीकल सेल चे पोह-आसीफ १५४६ पोह अश्वीन-२०६८ यांनी पार पाडलेली आहे.

----------

### तहसीलदार प्रतिभा गोरे हल्ला

सहकारी येईपर्यंत हायवा तेथीलच काही लोकांनी पळवून नेला आणि जेसीबी पारडगाव रोडला पळून जाण्याचे तयारीत होते. त्याचवेळी थोड्या अंतरावर जेसीबी चे टायर फुटल्यामुळे ते थांबले आणि तहसीलदारांनी पाठलाग करून तो जेसीबी पकडला. तेवढ्यात तिथे सात आठ तरुण आले आणि त्यांनी तहसीलदारांसह त्यांच्या सहकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला .या प्रकरणी तहसीलदार प्रतिभा गोरे यांनी परतुर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून इलियास कुरेशी ,अमजद कुरेशी, इरफान युनू शेख, जुनेद, आणि इतर सात आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

----------

### महिला दिनानिमित्त सरकारचं

महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि मुलभूत हक्कांसाठी लढा देण्याची महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आहे. राजमाता जिजाऊ मॉंसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आजच्या काळातही महिलांसाठी न्याय आणि सुरक्षा देणे तसेच प्रत्येक गाव आणि खेड्यापर्यंत महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून बालविवाह, जाचक विधवा प्रथा, अन्यायकारक अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच मुलींच्या जन्मदर वाढीसाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

------------

### लाचखोर महिला

यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले असून, सदर तलाठी देवनाळे यांच्यावर पोलीस ठाणे लोहारा येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालू आहे. दरम्यान, आरोपीची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे लाचेची ३ हजार ५०० रूपये रक्कम, इतर २ हजार ७६० रूपये रक्कम, ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, सोनाटा कंपनीचे मनगटी घड्याळ, सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल मिळून आला. तसेच आरोपीच्या घराचीही झडती घेण्यात येत आहे. आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असून, आरोपी ही महिला असल्याने तिला अटक करण्यासाठी न्यायालयाची परवानगी घेण्यात आली आहे. आरोपीस अटक करुन तपास करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. तसेच त्यांचा मोबाईल ताब्यात घेण्यात आला असून, पुढील निरीक्षण करून तपास करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक संदिप आटोळे, अप्पर पोलीस अधिक्षक मुकूंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंध विभाग धाराशिवचे पोलीस निरिक्षक विकास राठोड, पर्यवेक्षण अधिकारी म्हणून पोलीस उपाधिक्षक सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार नेताजी अनपट, सिद्धेश्वर तावसकर, जाकेर काझी यांच्या पथकाने केली. दरम्यान, भ्रष्टाचारासंबंधी कांही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

-----------

### याच अधिवेशनात मराठा समाजाच्या

केले नाही. यामुळे शिंदे समितीला काम करण्याचे निर्देश देण्यात यावे आणि नोंदी सापडलेल्या प्रत्येकांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा पावित्र्यात जावे लागेल असा इशारा जरांगे यांनी दिला.

**सरकारकडून सगेसोयऱ्यांवर कारवाई होत नसते**

एसईबीसी आरक्षण देण्यात आले मात्र शिष्यवृत्तीचा पर्याय एसईबीसीसाठी लागू केला नाही. यामुळे विद्यार्थ्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागणार आहे. हा प्रश्न तातडीने सोडवावा,अशी मागणीही त्यांनी केली. शिवरायांचा अवमान करणा-या प्रशांत कोरटकर यास न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिला असल्याकडे जरांगे यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले की, महापुरुषांचा अवमान झाला तरी सरकारकडून सगेसोय-यांवर कारवाई होत नसते, हे आपण यापूर्वीही सांगितल्याचे त्यांनी नमूद केले.

-----------

### शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर

द्याव्यात. सदर योजनेच्या माध्यमातून लाभ मिळेल असा प्रयत्न करण्यात यावा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद बीड यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वारसांना स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तके / वाचनालय उपलब्ध करुन द्यावे. मैदानी खेळांसाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी वापरुन जिल्हयात किमान २५ मैदाने तयार करावीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्याकडे २२८ अर्ज प्राप्त झालेले असून, त्यामध्ये बँकेने ३५टक्के सबसिडी दिलेली आहे. तसेच ९९ अर्ज मंजूर केलेले आहेत. उर्वरीत प्रलंबित अर्जावर विनाविलंब कार्यवाही करावी. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत कलम १८ अन्वये सावकारकीमध्ये सावकारांनी बळकावलेली (रजीस्ट्री करुन घेतलेली) १८ प्रकरणात २३.७७ हे. आर. जमिन शेतक-यांना परत केली असल्याचे सांगितले. त्याबद्दल त्यांचे अध्यक्ष यांनी अभिनंदन केले. व उर्वरीत प्रकरणांमध्ये ३ महिन्यात निर्णय घेण्याचे सूचित केले. विभागीय वन अधिकारी यांनी वन्य प्राण्यांपासून शेतक-यांचे नुकसानीमुळे मोबदला मिळण्यासाठी ज्या क्षेत्रात वन्यजीव जास्त आहेत त्या ठिकाणी वन विभागाच्या योजनेबाबत जनजागृती करावी. आष्टी, पाटोदा, धारुर व वडवणी या तालुक्यांमध्ये जास्त वनक्षेत्र असून, तेथील व जिल्हयातील नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यात यावा. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत शेतक-यांना एप्रिल २०२३ पासून १५० रु. प्रमाणे एकूण ४९१२४ शिधापत्रिकाधारकांना २६ कोटी ९२ लक्ष रुपयांचे वाटप केलेले असल्याचे सांगितले. विस्तार अधिकारी कृषी जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयामार्फत शेतक-यांसंबंधी आदिवासी विभागाच्या योजनेत २ शेतक-यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. रेशीम विकास अधिकारी, बीड यांनी मागील वर्षी १२१६ मे.टन उत्पादन तसेच यावर्षी ५७०० एकरवर लागवड केलेली असल्याचे सांगितले. यासंबंधाने अध्यक्ष यांनी दि.०७.०७.२०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिले. वरीलप्रमाणे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणेबाबत निर्देशही कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड निलेश हेलोंडे यांनी दिले. पक्षुच्या चा-यासंबधी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पीपीटीव्दारे माहिती सादर केली तर कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

-------------

### पाणीपुरवठा योजनेची बिले

द्यायचे कोणाला असा प्रश्न यंत्रणेसमोर निर्माण झाला आहे. येत्या मार्च अखेर उर्वरित निधी येईल असे यंत्रणांकडून सांगितले जात असून जोपर्यंत मागची देयके पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत नवीन देयकावर सह्या करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी नकार दिल्याचेही सूत्रांनी सांगितले.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनि वार, दि. ८ मार्च २०२५



## सद्भावना पदयात्रेत सहभागी व्हा –संभाजी जाधव

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात, बीड जिल्ह्यातील विविध जाती आणि धर्मातील बंधु भगिनींनी सहभाग घेण्यासाठी ८ आणि ९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा आयोजित करण्यात येत आहे. या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव यांनी केले आहे.

८ मार्च रोजी सकाळी स्व. संतोष देशमुख यांना अभिवादन करून या पदयात्रेची सुरुवात होईल. यानंतर नांदुरफाटा आणि येळंबफाटा मार्गे नेकनुर येथे मुक्कामी होण्यात येईल. दुसऱ्या दिवशी, म्हणजे ९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामी संस्थान येथून ही पदयात्रा सुरू होईल. यामध्ये मांजरसुंभा, पाली मार्गे बार्शीनाका, आणि मोमीनपुरा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून सुभाष रोड, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येईल. या पदयात्रेचा समारोप यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे होणार आहे. या सद्भावना पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अ. भा. काँग्रेसच्या सचिव खासदार रजनी पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह बीड जिल्ह्यातील व शहरातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत.जिल्ह्यातील सर्व जाती व धर्मातील लोकांना योगदान देण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव यांनी केले आहे.

# जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद

## केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन ,वेव्हज () या शिखर परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. जीओ वर्ल्ड कन्व्हेंन्शन सेंटर, मुंबई येथे दि.१ ते ४ मे २०२५ रोजी ही परिषद होईल. या परिषदेमध्ये भारतातील जागतिक स्तरावरील मिडीया आणि मनोरंजन क्षेत्रातली उद्योजक, धोरणकर्ते आणि नवकल्पनाकार सहभागी होणार असून मिडीया आणि मनोरंजन क्षेत्रातील उद्योगाच्या संधी आणि आव्हाने यावर परिषदेत चर्चा केली जाईल. या पार्श्वभूमीवर या परिषदेची नियोजनबद्ध तयारी सर्व विभागांनी समन्वयातून करावी असे निर्देश सूचना मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले.

मंत्रालयात मुख्य सचिव यांच्या दालनात जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद () आयोजनाबाबत उद्योग विभागातर्फे बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू, सहसचिव संजीव शंकर, सी. सेंथिल राजन, अजय नागभुषण एम एन आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन, 'एमआयडीसींचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू,उद्योग आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह,फिल्म डिव्हीजनच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पाटील, माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक अनिल भंडारी, विशेष पोलिस महासंचालक देवेन भारती,मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यासह केंद्रीय प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत पत्र सूचना कार्यालयाचे प्रधान महासंचालक, आकाशवाणी,दूरदर्शन आणि वेव्हज परिषदेचे नोडल अधिकारी उपस्थित होते.



भारतीय माध्यम क्षेत्र जागतिक स्तरावर

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू म्हणाले की, जगभरातील एकात्मतेसाठी भारतीय आध्यात्मिक वारसा जपणे,भारताला जागतिक कंटेंट हब आणि सामग्रीचा मोठा निर्यातदार बनवणे, बौद्धिक संपत्तीची समृद्ध परिसंस्था तयार करणे, भारतीय संस्कृती व भाषांची विविधता जपणे,भारतीय माध्यमांची जागतिक बाजारातील उपस्थिती वाढवणे,भारताला मोठ्या जागतिक गुंतवणूक बाजारपेठेचा केंद्रबिंदू बनवणे, भारतीय आणि जागतिक भागीदारांमध्ये सहकार्य आणि गुंतवणूक वाढवणे हा परिषदेचा उद्देश आहे. विविध देशांचे प्रतिनिधी, भारतीय उद्योग प्रतिनिधी आणि व्यापारी संघटना, राज्ये/ केंद्रशासित प्रदेशातील आलेले प्रतिनिधी,कंपन्या आणि स्टार्टअप्स,तंत्रज्ञान कंपन्या,सह-उत्पादन कंपन्या आणि चित्रपट निधी संस्था, खरेदीदार आणि विक्रेते, विशेष कौशल्य असलेले प्रतिनिधी दिग्दर्शक, निर्माते, सामग्री निर्माते, पटकथा लेखक यामध्ये सहभागी होतील असे जाजू यांनी सांगितले.

नवोन्मेषी मीडिया आणि मनोरंजन तंत्रज्ञान विषयांचे प्रदर्शन

श्री. जाजू म्हणाले की, ही परिषद चित्रपट, टीव्ही, ब्रॉडकास्ट, प्रिंट, रेडिओ, वृत्तपत्रे, नवीन मीडिया, जाहिरात, ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग, ई-स्पोर्ट्स, एआर,व्हीआर,एक्स आर, संगीत, लाइव्ह इव्हेंट्स इत्यादी मनोरंजनाशी संबंधित सर्व उद्योग क्षेत्रांवर भर देईल. याशिवाय चित्रपट आणि व्हिडिओ निर्मिती उपकरणे व तंत्रज्ञान, व्हर्च्युअल रिॲलिटी () आणि ऑगमेंटेड रिॲलिटी () उपाय, प्रगत कॅमेरा आणि चित्रिकरण तंत्रज्ञान,प्रसारण आणि स्ट्रीमिंग सोल्यूशन्स,डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्म आणि सामग्री वितरण नेटवर्क,ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स साधने, गेमिंग तंत्रज्ञान आणि परस्परसंवादी अनुभव, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (), इमर्सिव्ह अनुभव आणि नवीन तंत्रज्ञान ट्रेंडसह नवोन्मेषी मीडिया आणि मनोरंजन तंत्रज्ञान या विषयांचे प्रदर्शन या परिषदेत करण्यात येईल.

मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राला नवीन संधी या परिषदेच्या संपूर्ण कार्यक्रमासंदर्भात माहिती देताना जाजू म्हणाले की, संपूर्ण मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रासाठी ही शिखर परिषद म्हणजे एक जागतिक व्यासपीठ आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जागतिक मीडिया आणि मनोरंजन उद्योगाशी भारतातील या क्षेत्राची सांगड घालून या क्षेत्राचा विकास करणे हा आहे. २०२४ मध्ये मीडिया आणि मनोरंजन हा जागतिक उद्योग सुमारे २.९६ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सवर पोहोचत आहे. अशा वेळी आपल्या देशात होणारी वेव्हज ही शिखर परिषद या उद्योगाच्या वाढीस चालना देणारी ठरेल . मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राला यामध्ये नवीन संधी उपलब्ध होतील. तसेच भारताचा मीडिया आणि मनोरंजन उद्योग क्षेत्र २०२९ पर्यंत सुमारे ५०० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वेव्हज () या क्षेत्राच्या वाढीस मदत करण्यासाठी आणि जागतिक सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करण्यासाठी कार्य करेल. तसेच, धोरणात्मक सुधारणा आणि नवीन कल्पनांना प्रोत्साहन देईल''. मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की,राज्यात होणाऱ्या या जागतिक परिषदेच्या तयारीसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी. प्रत्येक विभागाने समन्वय साधून नोडल ऑफीसर नेमून कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करावे. परिषदेचे पूर्ण नियोजन, कार्यक्रम, पाहुण्यांचे आगमन व निर्गमन, प्रचार व प्रसिद्धी, आदरातिथ्य, पाहुण्यांची सुरक्षितता, पायाभूत सोयीसुविधा या प्रत्येक बाबींचे काटेकोरपणे नियोजन करण्याचे निर्देश मुख्य सचिव सौनिक यांनी दिले.

# जयश्री विधाते यांना जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

**जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान**

बीड प्रतिनिधी

राजकीय सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि आपल्या वार्डाचा नेतृत्व विकास करणाऱ्या कर्तव्यदक्ष नगरसेविका म्हणून ज्यांचा सर्वत्र परिचय आहे अशा सौ जयश्री विलास विधाते यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सौ जयश्री विलास विधाते या २०११ पासून आज पर्यंत बीड नगरपालिकेच्या आदर्श नगरसेविका आहेत. स्वच्छता व आरोग्य सभापती पद तसेच दोन वेळा महिला व बालकल्याण सभापती पद त्यांनी केवळ भूषवले नाही तर त्या पदाला खऱ्या अर्थाने न्याय दिला. मराठा क्रांती मोर्चात सक्रिय सहभाग घेणाऱ्या, गोरगरीब गरजूवंत महिला व मुलींना १९९६ पासून व्यावसायिक मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना शिका आणि कमवा ही संकल्पना राबवणाऱ्या, त्यांच्या हाताला काम आणि कामाला दाम मिळून देणाऱ्या, धार्मिक सामाजिक प्रबोधन पर कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करणाऱ्या, गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच मोफत पुस्तके वाटप करण्याची संकल्पना राबवणाऱ्या सातत्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणाऱ्या, वैद्यकीय मदतीसाठी सातत्याने पुढाकार घेणाऱ्या, एवढेच नव्हे तर पशु पक्षांना पाणी चारा आणि निवारा मेळावा म्हणून सातत्याने धडपड करणाऱ्या, स्त्रीशक्ती प्रतिष्ठानच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या आधार बनण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला. विशेष बाब म्हणजे नगरपालिकेमध्ये ठराव घेऊन कुंकवापलीकडची संक्रात ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात राबवली. दारूबंदीसाठी त्यांचा पुढाकार कायम चर्चेत राहिला. वार्डाचा नेत्रदीपक विकास करत एक कर्तव्यदक्ष नगरसेविका असल्याचं त्यांनी सातत्याने सिद्ध केलं. त्यांच्या या सर्वांगीण कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## आ. प्रकाशदादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्या –नगराध्यक्ष शेषराव जगताप



वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विकास प्रश्नांची जाण असणारे व प्रशासनाचा दांडगा अनुभव तसेच मराठवाड्यातील जनतेचे प्रश्न अवगत असलेल्या आमदार प्रकाशदादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्री कधी संधी द्या, दादा हे अजितदादा पवार यांच्या गटातील ज्येष्ठ नेते असून दादांनी यापूर्वी सहकार मंत्री म्हणून यशस्वी भुमीका निभावली तसेच परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही काम करीत असताना त्यांनी पालकत्व निभावले आहे, जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीच पालकमंत्री असतो हे दाखवून दिले, सतत दुष्काळग्रस्त व ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखले जाणाऱ्या बीड जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी प्रकाशदादांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्या, अशी मागणी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषराव जगताप यांनी केली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, अजित दादा पवार गटातील रिक्त झालेले कॅबिनेट मंत्रीपदी दादांना संधी द्या, यासाठी कार्यकर्ते आग्रह धरू लागले आहेत, प्रकाशदादांना प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे ,त्यांची प्रशासनावर वचक असून आजवर ते निष्कलंक राजकारणी म्हणून ओळखले जाते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. सुंदर रावजी सोळंके साहेब यांच्याकडून राजकारणाची धडे गिरवून सर्वसामान्यांच्या भल्याकरिता आजवर राजकारण केले, त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा आरोप अद्याप पर्यंत नाही, विरोधकांनाही दादांवर आरोप करीत असताना शंभर वेळा विचार करावा लागतो.जनतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न कसे सोडवायचे याचा त्यांना मोठा अनुभव आहे तसेच त्यांची प्रशासनाच्या कामावर बारकाईने लक्ष असते, दुष्काळग्रस्त बीड जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी तसेच मराठवाड्याचे प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्यासाठी दादांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी देणे ही काळाची गरज आहे, ते अजितदादा पवार यांच्या गटातील ज्येष्ठ नेते आहे, दादांनी मागच्या ५० वर्षापासून सर्वसामान्यांच्या हिताकरीताच राजकारण केले, २५ वर्षापासून ते माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असून माजलगाव मतदार संघाच्या जनतेला न्याय देण्यासाठी दादांना मंत्रिपद द्या, दादांना मंत्रीपद दिल्यास याचा फायदा अजितदादा पवार गटालाच होणार आहे , त्याकरिता आमदार प्रकाशदादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्री करा अशी मागणी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषराव जगताप यांनी केली आहे.



पान ६ वरून...

## मनीषा घुले यांच्या नवचेतना

सर्वांगीण विकास केंद्राच्या माध्यमातून एक प्रकारची जगण्याची चेतनाच देण्याचं काम करत आहेत मनीषा घुले यांनी २००८ साली नवचेतना या सर्वांगीण विकास संस्थेची स्थापना केली व आज या संस्थेच्या माध्यमातून बीड, परभणी, अहिल्यानगर, धाराशिव या चार जिल्ह्यात सहा हजार महिला बचत गटाच्या माध्यमातून ५५००० हजार महिलांना एकत्र करून त्यांचा विकास करण्याचे काम करत आहेत. तसेच या संस्थेच्या मार्फत ५०० महिलांना नवचेतना बँकेच्या माध्यमातून प्रत्येकी दहा हजार रुपयांपासून चाळीस हजार रुपयांची कर्ज स्वरूपात मदत देखील केलेले आहे व एका बचत गटासाठी एक लाखापासून दहा लाखापर्यंत कर्ज २००० बचत गटांना दुसऱ्या बँकेच्या माध्यमातून मनीषा घुले यांनी मिळवून दिले आहे. तसेच वीस पारधी वस्ती येथे वीस वर्ग खोल्या बांधून या ठिकाणी पारधी, कैकाडी, भिल्ल , वडार, भटक्या विमुक्त समाजाच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याचे काम ही संस्था करत आहे मनीषा घुले यांच्या संकल्पनेतून १५० बचत गटांना शासकीय वेगवेगळ्या योजनेतून प्रत्येकी ४२ हजार ५०० रुपयांची मदत मिळून दिली आहे नवचेतना या संस्थेला आतापर्यंत देशपातळीवरील दोन राज्य पातळीवरील चार व विविध असे एकूण २१ पुरस्कार मिळालेले आहेत या संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक वर्षाला बचत गटाच्या माध्यमातून गावोगावी एक लाख फळ झाडे लावण्याचे काम हे करत आहेत असे अनेक उपक्रम करून खऱ्या अर्थाने आज नवचेतना या सर्वांगीण विकास संस्थेच्या मार्फत निराधार, भटक्या विमुक्त दुर्लक्षित समाजातील लोकांना बचत गटाच्या माध्यमातून लोकांना स्वबळावर उभा करून ते आप आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असल्याचे अभिमानाने मनीषा घुले सांगतात.

## वडवणी तालुक्यातील अनागोंदी

फेरफार करत आहेत ही बाबत सुध्दा अत्यंत गंभीर आहे.तसेच वडवणी तालुक्यातील काही तलाठी हे मा. तहसिलदार साहेब अथवा दिवाणी न्यायालयाचे वारसांसबंधीचे कोणतेही आदेश नसतांनाही बेकायदेशीपणे काही वारसांना वगळुन त्यांना जे वारस घ्यावयाचे आहेत त्यांचीच नावे वारस फेरफारमध्ये घेवुन अत्यंत बेकायदेशीरपणे तसेच जमीन महसुल अधिनियमाच्या विपरीत जावुन फेरफार करत आहेत.वरील सर्व कृत्य हे वडवणी तालुक्यातील तलाठी हे त्यांच्या खाजगी व्यक्तीकडून अथवा दलालामार्फत करुन मोठया प्रमाणात आर्थीक हित साधतात. तरी वडवणी तालुक्यातील खाजगी व्यक्ती ठेवुन तलाठी सज्जाचा कारभार करणाऱ्या तसेच त्यांच्या माध्यमातुन नागरीकांची गळचिपी करुन आर्थीक हित साधणाऱ्या तलाठ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी व तलाठ्यांच्या खाजगी व्यक्ती ,दलाल यांचा बंदबस्त करण्यात यावा नसता दि.१० मार्च पासून तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसीलदार यांना वकील संघ वडवणी यांनी दि.५ मार्च रोजी सहिने दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

## बहुजन समाजाला स्वाभीमानी

हा सज्ज असला पाहिजे कार्यकर्ता म्हणून जी पकड प्रशासनावर असायला पाहिजे त्या पद्धतीने कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे यासह अनेक अशा महत्त्वाच्या सूचना देऊन मार्गदर्शन केले यावेळी जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांच्या निवडी

मानवी हक्क अभियानच्या बीड जिल्ह्याच्या प्रशिक्षण प्रमुखपदी ज्येष्ठ नेते तथा धडाडीचे कार्यकर्ते बंडू लोखंडे यांची निवड करण्यात आली त्याचबरोबर धारूर तालुका अध्यक्षपदी किसन लोखंडे यांची निवड पण प्रा.डॉ मिलिंद आवाड यांनी केली. या निवडी जाहीर करताच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत केले व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# दोन समाजातील जातीय तेढ कमी करण्यासाठी शिक्षक संघाने पुढाकार घ्यावा –राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचा जिल्हा मेळावा दिनांक ५ मार्च रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाचे राज्याचे अध्यक्ष श्री देविदास बसवदे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के उपस्थित होते. यावेळी आपल्या भाषणातून सध्या जाती-जातीमध्ये सामाजिक सलोखा राहिला नाही हा सामाजिक दरी कमी करण्याचे काम शिक्षकांनी पुढाकार घेऊन करण्याच्या भावना व्यक्त केल्या. शिक्षकाला समाजामध्ये प्रतिष्ठित मानले जाते व ग्रामीण भागामध्ये शिक्षकांबद्दल नेहमीच आदर व्यक्त केला जातो या अनुषंगानेच ग्रामीण भागामध्ये शिक्षकांचे ऐकणारे अनेक नागरिक आपल्याला दिसून येतात त्यासाठी सध्याचे सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन जाती जातीमध्ये वाढलेली दरी कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आज अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे वतीने समाजामधील विविध





क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव सोहळा व सन्मान सोहळा करण्यात आला. या सर्व व्यक्ती समाजामध्ये वंचित व्यक्तीसाठी काम करताना दिसत आहेत .अशा देखील एक सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम शिक्षकांनी केले आहे. अशा भावना राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केल्या आहेत.


यावेळी बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोकरावजी थोरात , उपजिल्हाधिकारी शैलेशजी सूर्यवंशी,अशोक हिंगे, परमेश्वर सातपुते, कल्याण लवांडे, हरिदास घोगरे, सुहास पाटील, गोरख अण्णा सिंघन, गणेश उगले, वैभव स्वामी, रमेश चव्हाण, डोके सर,सुनील कुर्लेकर,कैलास सपकाळ, सुरेश करांडे, मुबारक शेख, अशोक शिंदे, खेडकर सर,लहू पुरी,प्रतिभा शिनगारे,कल्पना रसाळ, राजश्री नलावडे, दुर्गा भारती, मधुमती दूग्गम,शरद पवळ, गणेश दळवी,शरद जोगदंड, श्रीकांत लहाने, विलास पवार,बाळासाहेब चिकने, तुकाराम पवार, संतोष शिंदे, महादेव राऊत, दादा येवले, सचिव कचरे सर इत्यादी उपस्थित होते. तसेच याप्रसंगी समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजसेवकांचा व विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या गुणवंताचा गुणगौरव करून सन्मान करण्यात आला. यामध्ये गौतमजी खटोड, ज्ञानेश्वर काशीद, निलेश मोहिते, वैष्णवी मोहिते, दत्ता बारगजे, मनीषा पवार, जोगदंड ऋषिकेश, सर्वोक्षा रमेश पिसाळ, अजिंक्य संतोष डोंगर, प्राची सूर्यकांत शिंदे इत्यादी गुणवंताचा गुणगौरव करून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे भारदार सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिभा शिनगारे यांनी केले.

cmyk




# राज्यात थंडी कधीपर्यंत असणार? राज्यातील तापमानाची स्थिती पुढील चार दिवस कशी राहील?

राज्यात दोन दिवस चांगलीच थंडी जाणवली. आज मात्र अनेक भागात तापमानात वाढ दिसून आली. राज्यातील बदललेल्या परिस्थितीविषयी हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे म्हणाले की, बुधवारपासून उत्तर भारतातून उत्तर दिशेने महाराष्ट्राकडे थंडी घेऊन येणारे वारे महाराष्ट्रातील संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच नाशिक आणि नगर उत्तर जिल्ह्यासहित महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यात धडकू लागल्यामुळे एकाकी ही थंडीत वाढ झाली. श्री. खुळे पुढे म्हणाले की, गेल्या दिड महिन्यापासून म्हणजे २५ जानेवारीपासून ते बुधवारपर्यंत बंगालच्या उपसागरातून पूर्वीय दिशेचे दमट व आर्द्रतायुक्त वाऱ्यांच्या एकसूरी वहनातून उत्तर दिशेने महाराष्ट्रात थंडी घेऊन येणाऱ्या वाऱ्यांना अटकाव होत होता. तो अटकाव वारा वहन प्रणालीतील बदलातून जाणवत आहे.




संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच नाशिक आणि नगर उत्तर जिल्ह्यासहित महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यात बुधवारपासून पहाटे ५ वाजेच्या किमान तापमानात एकाकी घसरण झाली. तर महाराष्ट्रातील काही ठिकाणी म्हणजे नगर, जळगाव, नाशिक ह्या शहर व जिल्हा परिसरात सकाळच्या वेळी थंडीची लाट आणि थंडीच्या लाटेसदृश्य स्थिती जाणवत आहे. किमान तापमानाचा पारा ह्या ठिकाणी १० अंशापर्यंत घसरू लागला आहे. ही परिस्थिती बुधवारपासून शनिवारपर्यंत असे चार दिवस राहण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह संपूर्ण कोकण तसेच पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर अशा जिल्ह्यांत मात्र ही स्थिती नाही.

तेथे पहाटेचे किमान तापमान हे सरासरी इतके किंवा काही ठिकाणी सरासरीपेक्षा काहीसे अधिक तर काही ठिकाणी किंचितसे कमी आहे, असेही खुळे यांनी स्पष्ट केले. पहाटेच्या किमान तापमानाचे ठिक असले तरी संपूर्ण विदर्भ, नगर, जळगाव, जेऊर वगळता उर्वरित महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यांत दिवसाचे तापमान म्हणजे दुपारी ३ वाजेच्या कमाल तापमानात सरासरीपेक्षा २ ते ३ अंशाने वाढ झालेली जाणवत आहे. मुंबईसह कोकणात तर ही वाढ ४ ते ५ अंशापर्यंत झेपावली आहे. त्यामुळे तेथे दिवसाची उष्णतेची ताप चांगलीच जाणवत आहे, असे त्यांनी सांगितले.

मुंबईसह संपूर्ण कोकणात उष्ण व दमट वातावरणातून जाणवत आलेला रात्रीचा उकाडा बुधवारपासून शनिवारपर्यंततच राहण्याची शक्यता जाणवते. तर रविवार आणि सोमवारही उष्णतेच्या लाटेची शक्यताही नाकारता येत नाही, असेही खुळे यांनी सांगितले.




## जागतिक दिवस: आंतरराष्ट्रीय महिला दिन

### महत्वाच्या घटना

१८१७ : न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजची स्थापना
१९११ : पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला.
१९४२ : जपानने म्यानमारची राजधानी रंगून जिंकली.
१९४८ : सर्व संस्थाने भारतीय जिल्ह्यामध्ये याच दिवशी समाविष्ट करण्यात आली.
१९४८ : फलटण संस्थान भारतीय गणराज्यात विलीन झाले.
१९५७ : घाना देशाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९७४ : चार्ल्स डी गॉल विमानतळ पॅरिस, फ्रान्स मध्ये सुरु झाले.
१९७९ : फिलिप्स कंपनी ने प्रथमच सार्वजनिकरित्या कॉम्पॅक्ट डिस्क चे प्रकाशन केले.
१९९३ : दमानिया एअरवेज या खाजगी विमानवाहतुक कंपनीने आपल्या पहिल्या विमानाला 'स्पिरीट ऑफ जे. आर. डी.' असे नाव देण्याचे ठरविले.
१९९८ : भारतीय क्रिकेट राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष रमाकांत देसाई यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
२००९ : भारतीय गोल्फ खेळाडू यांनी थायलंड ओपन खिताब स्वतःच्या नावावर केला.
२०१६ : पूर्ण घडलेले सूर्यग्रहण इंडोनेशिया आणि उत्तर पॅसिफिक मधून दिसले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : हरी नारायण आपटे मराठीतील जेष्ठ कादंबरीकार (मृत्यू: ३ मार्च १९१९)
१८७९ : ऑटो हान नोबेल पारितोषिकविजेते जर्मन शात्रज्ञ (मृत्यू: २८ जुलै १९६८)
१८८६ : जीवरसायन शास्त्रज्ञ एडवर्ड कालव्हिन केन्डॉल यांचा जन्म.
१८८९ : ओडीसा चे माजी मुख्यमंत्री विश्वनाथ दास यांचा जन्म.
१९२१ : अब्दूल हयी ऊर्फ 'साहिर लुधियानवी' शायर व गीतकार (मृत्यू: २५ आक्टोबर १९८०)
१९२८ : कथालेखक वसंत अनंत कुंभोजकर यांचा जन्म.
१९३० : चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ 'आरती प्रभू' साहित्यिक (मृत्यू: २६ एप्रिल १९७६)
१९३१ : मनोहारी सिंग पट्टीचे सॅक्सोफोन वादक (मृत्यू: १३ जुलै २०१०)
१९५३ : राजस्थान च्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंधिया यांचा जन्म.
१९५४ : गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांचा जन्म.
१९६३ : गुरशरणसिंघ, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६९ : मराठी चित्रपट अभिनेता उपेंद्र लिमये यांचा जन्म.
१९७४ : फरदीन खान हिन्दी चित्रपट कलाकार
१९८९ : भारतीय महिला क्रिकेटर हर्मंप्रीत कौर यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३५ : मेवाड ची राणी कर्णावती यांचे निधन.
१७०२ : विल्यम (तिसरा) इंग्लंडचा राजा (जन्म: १४ नोव्हेंबर १६५०)
१९४२ : जोस रॉल कॅपाब्लांका क्यूबाचा बुद्धीबळपटू (जन्म: १९ नोव्हेंबर १८८८)
१९५७ : बाळ गंगाधर तथा 'बाळासाहेब' खेर स्वतंत्र भारतातील मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे ब्रिटनमधील उच्चायुक्त (जन्म: २४ ऑगस्ट १८८८)
१९७२ : भारतीय चित्रपट अभिनेता तरुण बोस यांचे निधन.
१९८८ : अमरसिंग चमकिला, पंजाबी गायक.
२००९ : लोकसभेचे माजी सदस्य गिरधारीलाल भार्गव यांचे निधन.
२०१५ : प्रसिद्ध पत्रकार तसेच आउटलुक चे संपादक विनोद मेहता यांचे निधन.

# दूध उत्पादन वाढीसाठी केसा असावा दर्जेदार पशुआहार

जनावरांना दिला जाणारा आहार दुधाच्या गुणवत्तेवर परिणाम करत असतो. जनावरांच्या गरजेनुसार आहाराचे योग्य नियोजन केल्यास दुधाची प्रत सुधारण्यास मदत होते. जनावरांच्या आहारातील चारा आणि पशुखाद्यच्या प्रमाणावर दुधाची प्रत अवलंबून असते. चारा कुट्टीचा योग्य आकार महत्त्वाचा आहे. जो दुधाची प्रत ठरण्यास कारणीभूत असतो आहारामध्ये स्टार्सचे प्रमाण हा महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे दुधाची प्रत ठरवता येते. आहारमधून मधून दिल्या जाणाऱ्या पदार्थावर दुधाची प्रत अवलंबून असते. पशु आहारातील स्निग्धांश आणि प्रथिने यांची मात्रा दुधाची प्रत वाढवण्यास मदत करते.

चारा आणि पशुखाद्य चे प्रमाण (४० :६०) कमीत कमी असणे हे दुधाचा स्निग्धांश वाढवण्यास गरजेचे असते. हे प्रमाण ठेवल्यामुळे ओटीपोटातील आम्लता कमी होते प्रोपियनिक आम्लं निर्मिती वाढते जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करते.

धान्य युक्त आहार : योग्य पशुखाद्य घालताना चारा आणि पशुखाद्यचे प्रमाण आणि तंतुमय पदार्थ विरहीत कार्बोदकाचे प्रमाण महत्त्वाचं ठरतं. तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके यांचे प्रमाण एकूण शुष्क पदार्थाच्या आहारावर ३६ ते ३८ टक्के असावे. योग्य प्रमाणात तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश आणि प्रथिने वाढण्यास मदत होते. परंतु अति प्रमाणात खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश एक युनिट कमी होतो परंतु प्रथिने ०.२ ते ०.३ युनिटने वाढतात.

धान्य प्रक्रिया : धान्याचे प्रकार आणि त्यावर करावयाची प्रक्रिया याचा महत्त्वाचा परिणाम आहारामधील स्टार्च, पचनीयता, दूध वाढ तसेच दुधाची प्रत वाढवण्यास मदत होते दळलेले, रोल केलेले, गरम केलेले, स्टीम फ्लेवर्ड, वाफवलेले किंवा गोळी पेंड स्वरूपात धान्य खाऊ घातल्यास त्यामधून स्टार्सची पचनियता आणि प्रोपियनिक आमल निर्मिती वाढते. जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करतात.

स्टीम फ्लेक्स मका किंवा ज्वारी तुलनेनं वाफवलेला मका किंवा ज्वारी पेक्षा सातत्यपूर्ण दूध निर्मिती आणि दुधाचे प्रथिन वाढ होते परंतु दुधाच्या स्निग्धांश यांमध्ये बदल होत नाही. काही धान्य जसे की गहू मध्ये कार्बोदके असतात याचा आणि त्याच्यावरील अति प्रमाणातील प्रक्रिया विस्तृत प्रमाणात वापराचा परिणाम दुधाच्या स्निग्धांश आणि दूध निर्मिती कमी होण्यावर होतो. कार्बोदके आणि प्रथिनांचे माध्यम तसेच तंतुमय पदार्थ कर्बोदकांचे आहारातील प्रमाण यांचे निरीक्षण करावे जेणेकरून योग्य किणवन पद्धतीची खात्री होते. त्यामुळे दुधाची प्रत वाढण्यास मदत होते.

दूध उत्पादन वाढवण्यासाठी : व्यवस्थित भाकड काळ ठरवावा. वोता च्या पहिल्या आठवड्यात दुधाचा ताप ( रक्तातील कॅल्शिअम कमी होणे )येणार नाही याची काळजी घ्यावी.


व्यायल्यानंतर गाईची निगा राखावी. ओटीपोटातील आरोग्य आणि आम्लता प्रतिबंधित करावी. चयापचयाचे आजार ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना करावी. वेताच्या वेळी शरीर स्थिती गुण बीसीएस ३.० ते ३.२५ यादरम्यान ठेवावा.



# जनावरांना होणाऱ्या तोंडखुरी व पायखुरी आजाराची लक्षणे

**जनावरांमध्ये विविध प्रकारचे आजार होत असतात व त्याचा थेट परिणाम हा पशुपालनवर होत असतो. जर आपण जनावरांना होणाऱ्या आजारांकडे वेळेत लक्ष दिले नाही तर जनावर दगावण्याची शक्यता बळावते. वेळीच लक्षणे ओळखून उपचार केले तर होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून आपण वाचू शकतो. तोंडखुरी-पायखुरी या आजाराबद्दल माहिती घेतल्यास जनावरांचे आरोग्य राखण्यास मदत होते.**

या आजाराची लक्षणे : या आजारामध्ये जनावरांना ताप येतो. जनावरांचे शारीरिक तापमान १०२ ते १०४ डि. फे. किंवा यापेक्षा जास्त राहू शकतो. जनावरांच्या तोंडामध्ये हिरड्यांवर, जिभेवर तसेच गालाच्या आतील भागावर पाणी भरल्या सारखे फोड येतात. सोबतच पायांच्या दोन खुरान मधील भागावर फोड येतात व हे फोड लगेचच फुटतात. तेथे भाजल्यासारखे लाल चट्टे तयार होतात. यांची भयंकर आग होत असल्याने जनावरांच्या तोंडातून चिकटसर, तारे सारखी खूप लाड करते आणि जनावर लंगडत चालते. तोंडाची, जिभेची खूप आग होत असल्याने जनावरे खाणे पिणे बंद करते. तोंडातून मचमच असा आवाज येतो. दुधाळ जनावरे दुध एकदम कमी किंवा पूर्णतः बंद करतात.



वास्तविक पाहता हा आजार सहा ते सात दिवसांनी आपोआप बरा होतो. परंतु या आजारात ताप खूप येत असल्याने प्रतिकारशक्ती कमी होत जाते. त्यामुळे दुसऱ्या आजाराच्या जीवाणूंचा प्रादुर्भाव होऊन दुसरा एखादा आजार जडू शकतो. तसेच खुरातील जखमांवर माशा बसल्यास आळ्या पाडून जखम ची घडल्यास खूर गळून पडू शकते. दुधाळ विदेशी तसेच संकरीत जनावरांमध्ये या रोगाची तीव्रता जास्त आढळते. या आजारात मोठ्या प्रमाणात प्राणहानी होत नाही. परंतु या आजारामुळे दुधाळ जनावरांची दूध उत्पादकता जवळपास वीस टक्क्यांनी कमी होते आणि कष्टकरी जनावरांची काम करण्याची क्षमता ५० टक्क्यांनी कमी होते. लहान वासरे या आजारात मृत्युमुखी पडू शकतात.

या आजारावर औषध उपचार :

तोंडातील जखमा या तुरटीच्या पाण्याने ( पाच ग्रॅम तुरटी अधिक एक लिटर पाणी ) किंवा बोरिक एसिड मिश्रित पाण्याने (बोरिक ॲसिड अधिक एक लिटर पाणी ) किंवा तत्सम जंतुनाशकने धुवाव्यात. तोंडातील जखमांवर हळद, लोणी हळद किंवा बोरिक एसिड पावडर अधिका ग्लिसरीन यांचे मिश्रण लावावे. खुरातील जखमा पोटॅशियम परमॅग्नेट च्या पाण्याने ( एक ग्रॅम पोटॅशिअम परमॅग्नेट अधिक तीन लिटर पाणी) धुवाव्यात आणि जंतुनाशक मलम लावा. जखमेत अळ्या पडल्यास जखमेत पेंटाईन तेलाचा गोळा ठेवावा. हे औषध उपचार पशुवैद्यकाच्या सल्ल्याने करावेत.

याशिवाय आजारी जनावरे त्वरीत वेगळे करुन औषधोपचार सुरु करावा.

दुसऱ्या आजाराची लागण होऊ नये म्हणून पीडित जनावरांना प्रतिजैविकांची इंजेक्शन साधारणता चार ते पाच दिवस देतात. यासोबतच शक्तिवर्धक म्हणून जीवनसत्वाची इंजेक्शन द्यावीत. जनावरे अति आजारी असेल तर डेक्स्ट्रोज सलाईन इंजेक्शन पशुवैद्यक देऊ शकतात. होमिओपॅथी ची विशिष्ट औषधी सुद्धा रोज सकाळ संध्याकाळ सहा ते आठ गोळ्या या मात्रेत देता येतात. सांभार, मेथी किंवा पालक या सारखा भाजीपाला आजारी जनावरास खाण्यास द्यावा.

# यंदा उन्हाळी चवळी लागवड ठरेल फायदेशीर

दोन हंगामाच्या मध्ये अगदी कमी कालावधीत येणारी पिके घेणे फायद्याचे ठरते. समजा आता आपल्या शेतामध्ये कपाशी लागवड केलेली आहे. खरिपाचे पीक संपल्यानंतर बरेच शेतकरी गहू, मका आणि कांद्या सारखे पिके घेतात. परंतु यामध्येअगदी कमी कालावधीत येणारी म्हणजे शॉर्ट टर्म पिके घेतली तर हातात चांगला पैसा फार कमी कालावधीत येतो. यामध्ये टरबूज आणि खरबूज आणि दोन पिके देखील खूप महत्त्वाचा एक भूमिका निभावू शकतात. परंतु यामध्ये एक महत्वाचे शॉर्ट टर्म भाजीपाला पीक आहे ते म्हणजे उन्हाळी चवळी लागवड हे होय.

उन्हाळी चवळी लागवड ठरेल फायदेशीर :

उन्हाळी चवळीला लागणारे हवामान- हे उष्ण हवामानातील पीक असल्यामुळे कोरड्या आणि दमट अशा दोन्ही हंगामात चांगले येते. परंतु जर थंडीचे प्रमाण जास्त असेल तर हे पीक चांगले येत नाही. वीस अंशाच्या खाली तापमान चवळी पिकाला मानवत नाही. परंतु उष्ण तापमान म्हणजेच ४० अंश सेंटिग्रेड असेल तर हे पीक चांगले तग धरते आणि पाण्याचा चांगला पुरवठा असल्यास जोमाने वाढून उत्पन्न देखील भरपूर होते.

लागणारी जमीन- जमिनीची निवड या पिकाला जास्त प्रभावीत करत नाही. अगदी हलक्या ते मध्यम किंवाभारी जमिनीत देखील हे पीक उत्तम येते.परंतु पाण्याचा निचरा ज्या जमिनीत योग्य होत नाही अशी चिकन मातीची जमीन या पिकासाठी निवडू नये. पाण्याचा उत्तम निचरा होणारी कुठलीही जमीन आणि सहा ते साडे आठ आम्ल-विम्ल निर्देशांक असलेल्या सेंद्रिय पदार्थयुक्त जमिनीत हे पीक चांगले येते.



उन्हाळी चवळी ची पूर्व मशागत व पेरणी - लागवड करण्यापूर्वी जमीन चांगली नांगरून घ्यावीव कुळवाच्या पाळ्या देऊन भुसभुशीत करावी. पूर्वमशागत करताना हेक्टरी १० ते १५ टन कंपोस्ट अथवा शेणखत टाकावे आणि चांगले मिसळावे. जर भाजीपाल्यासाठी हे पीक घ्यायचे असल्यास सरी वरंबे तयार करावेत. दोन रोपांमधील अंतर १५ सेंटिमीटर ठेवून वरंब्याच्या मध्यावर बी टोकावे. दोन सरीमधील अंतर ४५ सेंटिमीटर ठेवावे. जर आपण बाजारपेठेचा विचार केला तर हल्ली उच्च प्रतीच्या, कोवळ्या आणि एक सारख्या लांबीच्या शेंगांचे मागणी भरपूर असते त्यामुळे झुडूप वजा चवळी पिकाची लागवडगादी वाक्यांवर टोकण पद्धतीने करून पीक आणि खतांच्या मात्रा ठिबक सिंचन पद्धत वापरून द्यावे. यामुळे शेंगांची प्रत उत्तम मिळते उत्पादन देखील चांगले राहते. जमिनीची मशागत पूर्ण झाल्यानंतर गादीवाफे ६० सेंटिमीटर रुंद ३० सेंटिमीटर उंच आणि दोन गादी वाफ्यांमध्ये ४० सेंटीमीटर अंतर ठेवून तयार करावे. गादीवाफ्यावर लागवड करायची असल्यास दोन ओळींमध्ये करावीव दोन ओळीतील अंतर ४५ सेंटिमीटर ठेवून दोन रोपांमध्ये १५ सेंटिमीटर अंतर ठेवावे.

उन्हाळी चवळी लागवडीचा हंगाम- लागवड साधारणतः उन्हाळी आणि खरीप या दोन्ही हंगामात करता येते परंतु हिवाळ्यामध्ये थंडी असल्याने चवळी पीक घेऊ नये. उन्हाळ्याची लागवड करायचे राहिल्यास फेब्रुवारी, मार्चमध्ये तर खरीप हंगामात जून आणि जुलै महिन्यात करावी.

आवश्यक खत व्यवस्थापन- खतांचे प्रमाण ठरवतांना जमिनीची सुपीकता तसेच कुठल्या हंगामात लागवड केली आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे.तसेच माती परीक्षण करून घेणे गरजेचे आहे.परंतु साधारण विचार केला तर चवळी पिकाला हेक्टरी ५० किलो नत्र,७५ किलो स्फुरद आणि ७५ किलो पालाश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. जमिनीची मशागत पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण स्फुरद आणि पालाशव अर्धी मात्रा नत्राची बियाणे पेरणीपूर्वी जमिनीत पेरून द्यावी.त्यानंतर पहिली खुरपणी झाल्यानंतर म्हणजे २० ते ३० दिवसांनी राहिलेला अर्धा नत्राचा हप्ता द्यावा.

चवळी पिकाची काढणी आणि उत्पादन- लागवड केल्यापासून सहा ते आठ आठवड्यांनी झाडाला फुले येतातव त्यानंतर दोन आठवड्यांनी शेंगा तोडणीस तयार होतात. शेंगा भरदार आणि कोवळ्या तयार झाल्या की त्यांचे तोडणी करावी. खास दान्यासाठी पूर्ण पक्व झालेल्या शेंगा सुकल्यानंतर काढाव्यात.वरचेवर तोडणी करत राहिल्यास कोवळ्या शेंगा मिळतात.एकदा उत्पादन सुरू झाले तर सात ते आठ आठवड्यापर्यंत तोडणी चालते.

हेक्टरी सुमारे ९० ते १२० क्विंटल हिरव्या शेंगांचे उत्पन्न मिळते. तर खरीप हंगामात १५ ते २० क्विंटल तर उन्हाळी हंगामात १० ते १५ क्विंटल प्रति हेक्टरी वाळलेल्या दाण्याचे उत्पादन मिळते.

# स्वावलंबी आणि सक्षम बनण्यासाठी महिलांनी संस्कृता बनलं पाहिजे

## कुलगुरू प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव यांचे प्रतिपादन

बीड। प्रतिनिधी

एक स्त्री जेव्हा संस्कृता बनते, तेव्हा ती केवळ स्वतःसाठीच नाही, तर समाजासाठीही एक आदर्श बनते. ती स्वतःच्या कौशल्यांद्वारे समाजात बदल घडवते आणि इतर महिलांनाही प्रेरणा देते, त्यामुळे तुम्ही स्वावलंबी आणि सक्षम बनवण्यासाठी संस्कृता बनलं पाहिजे, असे प्रतिपादन एसएन डीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू माननीय प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव यांनी केले.बीड शहरातील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन या महाविद्यालयाच्या नूतन इमारतीतील इंग्रजी भाषा प्रयोगशाळा तसेच विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू माननीय प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते शनिवार ०६ मार्च रोजी संपन्न झाले, यावेळी त्या बोलत होत्या.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून एसएनडीटी महिला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा.डॉ.साईनाथ बनसोडे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रदीप रोडे होते. व्यासपीठावर देवगिरी प्रतिष्ठानच्या सचिव मा.दीपा रोडे, तुलसी






कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे प्राचार्य मा. डॉ.अशोक दुलधुले आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना माननीय कुलगुरू प्रो.डॉ.उज्वला चक्रधर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सोबतच विद्यापीठाच्या विविध कल्याणकारी योजना राबण्याचे आवाहन केले, तसेच विद्यार्थिनींनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार करा. तुमच्या हातात असलेल्या स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर करून माहिती गोळा करा आणि त्या आधारे व्यवसाय पुढे न्या. लहान व्यवसायापासून सुरुवात करून इतरांनाही नोकरी द्या. आई-वडिलांचा विरोध असला तरी त्यांना समजावून सांगा की व्यवसाय हा एक सुरक्षित आणि यशस्वी पर्याय आहे. स्वप्नं पाहण्याऐवजी ती साकार करण्यासाठी ठोस पावले उचला. आम्ही तुमच्या प्रयत्नांमध्ये मदत करण्यासाठी आम्ही सदैव उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ मध्ये एसएनडीटी महिला विद्यापीठाची स्थापना केली आणि त्यावेळी फक्त पाच विद्यार्थ्यांना घेऊन या संस्थेची सुरुवात केली. त्यांच्या दूरदृष्टीच्या स्वप्नात हे विद्यापीठ एक दिवस मोठे होईल आणि महिलांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करेल अशी कल्पना होती. आज हे विद्यापीठ खरोखरच वटवृक्षाच्या स्वरूपात वाढले आहे, ज्याच्या छायेत हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत,असे डॉ. साईनाथ बनसोडे यांनी सांगितले.अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे यांनी संस्था आणि महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसह सर्वांगीण प्रगती संदर्भात माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरवातीला कुलगुरूंनी महाविद्यालयातील विविध विभाग आणि विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधांची पाहणी केली. तसेच यावेळी महाविद्यालयाद्वारे फॅशन डिझाईन प्रदर्शन भरवण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थिनींनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून प्लॅस्टिक, कागद, फेब्रिक स्क्रॅप, आणि इतर पुनर्वापरयोग्य सामग्रीचा वापर करून विविध प्रकारचे ड्रेसेस आणि हॅण्डमेड ज्वेलरी डिझाईन केले होते. ते पाहून कुलगुरूंनी त्यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करून विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले. एकंदरीत नियोजन व सुविधा पाहून त्यानी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अस्मिता साळवे यांनी केले. प्रा.अश्विनी बेद्रे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला, तर आभार डॉ सारादी गोगई यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन आणि कडबा शार्क सर्किटने जळाले



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे महाजनवाडी येथे आज दि.७ सोमवार रोजी दुपारी २ वाजता शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे येथील गट नंबर २१७ मधील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण घरत यांचे १५ क्विंटल सोयाबीन आणि २०० ज्वारीचा कडबा असे एकुण ६५ हजार रूपयांचे नुकसान झाले तर लगतच्या गट नंबर २१६ मधील शेतकरी राणुबाई रामचंद्र शिंदे यांच्या शेतातील सोयाबीन १० क्विंटल अंदाजे किंमत ४० हजार रुपये शार्ट सर्किटमुळे जळाले. महावितरणच्या गलधान कारभारामुळे हि आग लागुन नुकसान झाल्याने आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फोनवरून तहसीलदार चंद्रकांत शेळके, महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे आणि नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना फोन वरून कल्पना दिली असुन पंचनामा करण्यासाठी कर्मचारी पाठवतो म्हणाले. नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

# आदित्य महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटरला मिळाली मान्यता

बीड। प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्था ही बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील एक नावाजलेलं नाव आहे. संस्थेने शिक्षणाचा दर्जा कायम राखत प्रगती केली आहे. आज आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी देशात आणि देशाबाहेरील नामवंत संस्थेत मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेला पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात मानाचे पान मिळाले असून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला मिळाली मान्यता मिळाल्याने आता बीड जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी येथे येवून प्रात्यक्षिक, तांत्रिक नॉलेज प्रगत करता येणार आहे.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयास शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (यांत्रिकी विद्यापीठ),पुणे आणि आय आय टी खरगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने (वर्चुअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळा) मान्यता मिळाली असुन समंजस करार झालेला आहे. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना अ‍ॅडव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ऍडव्हान्स माहिती या लॅब द्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक तांत्रिक नॉलेज प्रगत करण्यासाठी मदत होणार आहे.या कार्यशाळेचे शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील नॉलेज यामधील दुवा भरून निघणार आहे. ही कार्यशाळेची परवानगी मिळण्यासाठी आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर पंकज कडू यांनी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले. इतर महाविद्यालयाचे विभाग प्रमुख आणि प्राध्यापक यांनी परिश्रम घेतले.

> या कार्यशाळेचा आदित्य शिक्षण संस्थेसह जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अ‍ॅडव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ऍडव्हान्स माहिती या लॅब द्वारे मिळणार आहे. विद्यार्थ्यांना येथे येवून प्रात्यक्षिक करता येणार आहे. त्यांच्या तांत्रिक नॉलेजमध्ये मोठी भर पडणार आहे.
>
> -डॉ. आदित्य सारडा,
> संचालक आदित्य शिक्षण संस्था

# पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाहीमुळे पिडीत शेतकऱ्यांचा वाली कोण?

## केंद्रीय ऊर्जा मंत्री नाईक व मुख्यमंत्री फडणवीस यांना तक्रार

बीड । प्रतिनिधी

पवनचक्की कंपन्यांना काही समाजकंटकांत्र कडुन त्रास दिला जात असल्याची तक्रार ४६ पवनऊर्जा कंपन्यांची संघटना असलेल्या ''विपा'' ने केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना केली आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी बीड यांना पत्र पाठवून कंपन्यांना त्रास देणारांचा बंदोबस्त करावा असे लेखी आदेश दिले आहेत. पवनचक्की कंपन्यांना त्रास देणारे, खंडणीखोर यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी मकोका अंतर्गत कारवाई व्हायला हवी याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याचे स्वागतच आहे मात्र याचवेळी बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक, दडपशाही, शासनाची दिशाभूल करणे,पोलिस प्रशासनाच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करणे आदी घटना घडत असताना या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समितीचे स्थापना केलेली आहे.

या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांचे निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभाग अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार सचिव आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव करून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी लकी ड्रॉसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बंधू लाभार्थ्यांना सन २०२४-२५ मधील जिल्हा परिषदेचे स्व.उत्पन्न ५ टक्के दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधी मधून अस्तिव्यंग प्रवर्गीय दिव्यांगाना मोफत तीन चाकी स्कूटर ( विथ अ‍ॅडप्टरचा ) पुरवठा करण्याची राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयामार्फत अर्जाची मागणी करण्यात आलेली होती. सदर बाबतची खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.बीड- १७४ अर्ज, परळी-६६ धारुर- ४७, अर्ज वडवणी- ५०, केज-५५, शिरूर कासार- ८९, आष्टी-१६०, माजलगाव-१५७, गेवराई- ३७१, अंबाजोगाई- १११ आणि पाटोदा ४८ अर्ज प्राप्त झाले असून ५४ दिव्यांग लाभार्थ्यांना तीन चाकी स्कूटरचा पाठपुरवठा करायचा आहे सदर ५४ उद्दिष्ट दिव्यांग सर्वेक्षण २०२५ नुसार त्या त्या तालुक्यातील अस्थिभंग प्रवर्गाच्या संख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे १३२८ अर्ज प्राप्त झाले असून एकूण ५४ दिव्यांग बांधवाना तीन चाकी विथ अ‍ॅडप्टरचा पुरवठा करावयाचा असून सदर ५४ उदिष्ट दिव्यांग सर्व्हेक्षण २०२५ नूसार त्या त्या तालुक्यातील अस्थिव्यंग प्रवर्गाच्या प्रमाणात खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. बीड- ९, परळी-४,धारूर-२ वडवणी-२, केज-५, शिरूर कासार- ४, आष्टी-६, माजलगाव- ४, गेवराई- ८, अंबाजोगाई-८ आणि पाटोदा- २ असे एकूण ५४ अर्ज. अर्जाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे निर्धारित उद्दिष्टनुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड येथे लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर लकी ड्रॉ इन कॅमेरा व सर्व दिव्यांग लाभार्थ्या समक्ष करण्यात येणार असून सर्व अर्जदार यांनी लकी ड्रॉ साठी उपस्थित राहावे असे जिल्हा समाज कल्याणच्या समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# स्वाधार योजनेचे अर्ज भरण्यासाठी १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

बीड। प्रतिनिधी

समाज कल्याण कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील इयत्ता ११ वी त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना घर भाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यात त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी या वेब पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे

योजनेचे अर्ज करण्यास १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालुका स्तरापर्यंत वाढविण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे उशीर सुरू होणारे शैक्षणिक सत्र, ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी इत्यादी कारणामुळे विविध विद्यार्थी संघटना पालक विद्यार्थ्यांकडून सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती त्यानुसार आयुक्त यांचे पत्र क्रमांक ६२२ दिनांक ४ मार्च २०२५ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत १५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी बँक तपशील भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करून देण्यात आलेला आहे त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांचे बँक तपशील भरून घेण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये भारतरत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या अर्जामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडून सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगिनला सेंट टु अप्लिकेशन पाठवले आहेत विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगिनमध्ये अर्जाची स्थिती तपासावी व काही त्रुटी असल्यास पुन:श्च अर्ज सबमिट करावा तसेच नमूद सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगिनला जाऊन बँक तपशील भरण्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त प्रदीप वेणू मुरलीधर भोगले यांनी केले आहे.

# शिरूर मधील सर्व शेतरस्ते महसुल अभिलेखात नोंद होणार -घोळवे

शिरूर

शिरूर तालुक्यातील शेतक-यांना सुस्थितीत शेतरस्ते नसणे हि प्रमुख समस्या विचारात घेता.शिवराम राऊत यांच्याकडून अनेक वर्षापासुन या बाबतीत संघर्ष व पाठपुरावा चालू असतो.सद्यस्थितीत वापरातील, शेतरस्ते, पायवाट, गाडीरस्ते, नंबरबांधरस्ते, सर्वे नं. रस्ते, वस्ती जोड रस्ते, शीव रस्ते, हे वापरात अनेक वर्षापासुन असतात परंतू त्यांची शासनाच्या महसुल अथवा भूमी अभिलेख मधील प्रमाणित नकाशात नोंदच नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात.यामधील प्रमाणित दस्तावेज नसल्याने या रस्त्याचे मजबुतीकरण,पांदन रस्ते योजना,खडीकरण,मजबुतीकरण,व विविध योजनेच्या लाभ देता येत नाही.तसेच काही खोडकर शेतकरी रस्ता आडवणे, अतिक्रमण करणे,बांधरेटणे, रस्ते विकास कामात संमती न देणे, यामुळे शेती वहिवाटीस अडथळा निर्माण होऊन शेतक-यांतील संघर्ष विकोपाला जातो. काहि राजकिय हेवेदावे, जूण्या भांडणाच्या कुरापती मधून शेतक-यांना वहिवाटीस व येण्या- जाण्यास मज्जाव करणे यामुळे महसुली प्रशासनाने किमान हिवरसिंगा सज्जा अंतर्गत सद्यस्थितीत वापरातील सर्व प्रकारच्या रस्ते प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्यांचा पंचनामा करून त्या-त्या गट नं.,सर्वे नं.च्या इतर हक्कात सदरील रस्ता प्रकार,त्यांची लांबी-रुंदी यांच्या नोंदी घ्यावी व भूमी अभिलेख कार्यालयातील गाव नकाशात प्रमाणित करण्यासाठी सहकार्य करावे यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष शिवराम राऊत,उपाध्यक्ष श्री.माऊली शिंदे. यांनी शिरूर तालुक्याचे तहसिलदार श्री.घोळवे यांची भेट घेऊन या विषयी मागणी करताच.संबधित यंत्रणेला सुचित करत पूर्ण तालुक्यातील मंडळाधिकारी,तलाठी व गाव रस्ता समितीच्या माध्यमातुन प्रचलित वहिवाटीत असणारे सद्यस्थितीला रस्ते पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष रोजगार मेळावा

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय सावरकर नगर नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी, जालना रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.



गुरुकुल इंगलिश स्कुल बीड, येथे प्राथमिक शिक्षक एकूण पदे-२० शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५ जॉब लोकेशन- बीड.एल. आय. सी बीड, विमा सखी एकूण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ जॉब लोकेशन-बीड जिनिअस इंगलिश स्कुल, बीड येथे व्हाईस प्रिनसिपल एकुण पदे ०१ शैक्षणिक पात्रता-ग्रॅज्युएट,बी.एड अनुभव ५ वर्षे अकांउट/ क्लार्क एकुण पदे ०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/एम.कॉम/टॅली अनुभव २ वर्षे प्राथमिक शिक्षक- एकुण पदे ११ शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५,समर्थ नर्सिग स्कुल, बीड येथे प्राचार्य, एकुण पदे-०१ शैक्षणिक पात्रता-बी.एस.सी नर्सिग वयोमर्यादा १८ ते ३० टयुटर, एकुण पदे-०९ शैक्षणिक पात्रता-बी.एस.सी नर्सिग वयोमर्यादा १८ ते ३०, अकाउटंट/ क्लार्क- एकुण पदे-०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/एम.कॉम/टॅली वयोमर्यादा १८ ते ३०,एस.जी.सॉप्टवेअर सोल्युशन, मार्केट डेव्हलपमेंट ऑफिसर, एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० धुत ट्रान्समिशन छ.संभाजी नगर, ट्रेनी इंजिनिअर, एकुण पदे-७० शैक्षणिक पात्रता-डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा- १८ते २४ जॉब लोकेशन- छ संभाजीनगर ग्रिव्हज कॉटन छ.संभाजी नगर येथे ट्रेनी इंजिनिअर, एकुण पदे-७५ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा- १८ते २४ जॉब लोकेशन- छ संभाजीनगर क्रेडिट ॲक्सेस नागपुर, येथे केंद्र मॅनेजर- , एकुण पदे -५० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० जॉब लोकेशन- अहिल्यानगर / पुणे टॅलेनसेतु सर्विसेस, पुणे येथे ट्रेनी एकुण पदे -५० शैक्षणिक पात्रता १० वी/१२ वी/ आय.टी.आय/ डिप्लोमा वयोमर्यादा १८ते ३० जॉब लोकेशन- अहिल्यानगर / पुणे शिवशक्ती ॲग्रीटेक,बीड येथे सेल्स रिप्रजेन्टेटिव्ह एकुण पदे १५ शैक्षणिक पात्रता १० वी/ पदवी/ कृषी पदविका वयोमर्यादा १८ते २२ जॉब लोकेशन- बीड दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय, सावरकर नगर, नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी जालना रोड बीड. येथे प्रत्यक्ष येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास श्री. जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले यांनी केले आहे.

# चंपावती काकी पानसंबळ यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी



आष्टी मतदार संघातील नामांकित आणि सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेल्या सौ चंपावती काकी कृष्णा पानसंबळ यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पाटोदा येथील माजी आमदार लक्ष्मणराव जाधव यांच्या कुटुंबीयांत जन्म घेतलेल्या आणि माजी आमदार लिंबाजीराव पानसंबळ यांच्या सुनबाई असलेल्या चंपावती काकी कृष्णा पानसंबळ यांना सक्षम राजकीय वारसा असतानाही शिरूर तालुक्यातील आणि आष्टी मतदार संघातील उपेक्षित, वंचित यांच्या मदतीला आणि पीडितांना न्याय देण्यासाठी कायम संघर्षाची भूमिका घेत ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता कायम प्रत्येकांच्या मदतीसाठी सदैव पुढाकार घेणाऱ्या म्हणून चंपावती काकी कृष्णा पानसंबळ यांची ओळख आहे. पती प्रशासकीय सेवेत कार्यकारी अभियंता असतानाही त्यांचे सामाजिक आणि राजकीय कार्य निश्चितच उल्लेखनीय आहे.त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.८ मार्च २०२५ | ६

# वडवणी तालुक्यातील अनागोंदी कारभार करणाऱ्या तलाठ्यांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी

## वकील संघाने दिला १० मार्च पासून आमरण उपोषणाचा इशारा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व तलाठी कार्यालयातील महसुली मालमत्तेचा कारभार हा खाजगी व्यक्तीकडून सुरू असून यामध्ये शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुट केली जात आहे तसेच तालुक्यातील काही सज्जाचे तलाठी हे गावठाण हद्दीतील एन.ए. व लेआवुट न झालेल्या मिळकतीचे झालेले खरेदीखत हे सदर खरेदीखतामध्ये गट नंबरचा उल्लेख नसतांनाही तसेच सदरचा फेरफार घ्यावा याबाबत मा. तहसिलदार साहेब, अथवा मा. दिवाणी न्यायालय यांचे आदेश नसतांनाही पाचशे रुपयाच्या मुद्रांकावर समंतीपत्र घेऊन सातबारा उतारेला गट नंबर मध्ये फेरफार करत आहेत तरी याविषयी तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसता १० मार्च पासून तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे वकील संघ वडवणी यांनी दिला आहे.



वडवणी तालुक्यातील सर्व तलाठी कार्यालयात खाजगी व्यक्ती कडून कारभार चालत असुन वडवणी तालुक्यातील तलाठी हे खाजगी व्यक्तीमार्फत तलाठी सज्जाचे काम पहतात. वडवणी तालुक्यातील काही तलाठी हे कधीच सज्जावर जात नाहीत. तसेच ते फक्त तहसिल कार्यालयात मिटींग असेल तेव्हांच हजर असतात त्यांचा कारभार त्यांच्या हाताखालील काम करणारे खाजगी व्यक्ती करतात. ज्याचा की, तलाठी सज्जाशी कोणात्याही प्रकारचा सबंध नसतांना ही कारभार पहातात वडवणी तालुक्यातील काही तलाठी हे शेतकऱ्यांकडुन व नागरीकाकडुन पैसे उकळण्यासाठी त्यांनी खाजगी दलालाची नेमणुक केलेली असुन खाजगी दलाल हे त्यांच्या मनमानी प्रमाणे शेतकऱ्यांकडुन पैसे उकळतात. तलाठयांनी नेमलेले खाजगी दलाल हे त्यांच्याकडे आलेले काम हे विशिष्ट वकीलांकडे पाठवतात.

तसेच तालुक्यातील काही तलाठी हे गावठाण हद्दीतील एन.ए. व लेआवुट न झालेल्या मिळकतीचे झालेले खरेदीखत हे सदर खरेदीखतामध्ये गट नंबरचा उल्लेख नसतांनाही तसेच सदरचा फेरफार घ्यावा याबाबत मा. तहसिलदार साहेब, अथवा मा. २५ दिवाणी न्यायालय यांचे आदेश नसतांनाही पाचशे रुपयाच्या मुद्रांकावर समंतीपत्र दाखवुन ७/१२ पत्रकास सदर गट नंबरला संबंधीत मिळकत खरेदीदाराचे नाव लावतात. सदरची बाब ही अत्यंत गंभीर असुन तलाठी यांना न्यायालयाचे अधिकार नसतांना ही ते ७/१२ पत्रकांस नाव लावण्याचे ◀◀ पान ३ वर

## कैलास बोराडे यांना चटके देणाऱ्या गाव गुंडावर मकोकासारखा गुन्हा नोंद करावा



### मारहाण प्रकरणी तहसीलदार यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील अन्वा येथील कैलास गोविंद बोराडे यांना झालेली अमानुष मारहाण व जिवे मारण्याचा प्रयत्न ही घटना पुरोगामी महाराष्ट्राला व मानवतेला काळीमा फासणारी आहे. या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ पकडून त्यांच्यावर मकोका सारखा गुन्हा नोंद करुन आरोपीस तात्काळ अटक करावी. अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा असलेले लेखी निवेदन कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव गायकवाड, आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे, माझी जि प सदस्य प्रा. प्रकाश गवते, माजी समाज कल्याण सभापती कल्याणराव आबूज, माजी सरपंच ज्ञानेश्वर सरवदे , वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे ,अविनाश कांडुरे, मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोकराव डोणे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, संतोष देवकते, प्रभाकर धरपडे, अशोक ढगे, दत्ता येवले, नंदकुमार सजगणे, अनिल हिवरकर, रासपचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबूज, दत्ता सातपुते, भाई विष्णु शेळके , व सकल ओबीसी समाज यांनी तहसीलदार यांना दिले आहे.

# वडवणी ते चिंचोटी रस्त्यासाठी जागरण गोंधळ

## रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आमदाराच्या दारासमोर जगरण गोंधळ घालणार –विनोद काकडे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी ते चिंचोटी या तिन किलोमीटर रस्ता अत्यंत खड्डेमय झाला असून यामध्ये वाहन चालवतांना मोठी कसरत करावी लागत आहे.या रस्त्या करण्यासठी प्रशासनाला वेळोवेळी निवेदते देऊनही या रस्त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.या रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवावे व या रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आमदारांच्या दारासमोर जागरण गोंधळ घालण्याचा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी दिला आहे.




तालुक्यातील सहा गावातील नागरीकांना तालुक्याला दळण वळणासाठी हा एकमेव रस्ता आहे.या तिन किलोमिटरच्या रस्त्यावर मोठ मोठे खड पडल्याने या रस्त्याची दयनिय आवस्था झाली आहे.या रस्त्यावरून जातांना प्रवाशांना जिवघेणा प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यासाठी प्रशासनाला वेळो वेळी निवेदन व आंदोलनाचे इशारे दिलेले आहेत याकडे सपशल दुर्लक्ष केले जात आहे.या झोपलेल्या प्रशासनाला जाग करण्यासाठी वडवणी चिंचोटी रोडवरील खड्यात जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.आम्ही तात्काळ खड्डे बुजवण्यासाठी निधीचा प्रस्ताव व रस्ता मंजुरी साठी प्रस्ताव वरीष्ठांकडे पाठऊ असे लेखी निवेदन आंदोलकांना देण्यात आले.यावेळी प्रशासनाकडून वडवणी तहसिलदार वैभव महींद्रकर,जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग धोंगडे,सुनिल राठोड, शाखा अभियंता पंचायत समीतीचे के आर सानप,स्थापत्य अभियंता कृष्णा शेळके,तलाठी अंजु तरवरे मॅडम,पोलिस प्रशासनाचे कर्मचारी उपस्थीत होते.

# बहुजन समाजाला स्वाभीमानी बनवण्याचा लढा मानवी हक्क अभियान लढणार –प्रा.डॉ.आवाड

माजलगांव । प्रतीनीधी

मानवी हक्कअभियान केद्रीय कार्यालय तेलगाव येथे जिल्हातील प्रमुख कार्यकर्ता बेठकीचे आयोजन करण्यात आले होते. बहुजन समाजाला स्वाभिमानी बनवण्याचा लढा मानवी हक्काच्या माध्यमातून आपण लढत आहोत त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी या स्वाभिमानाच्या लढाईत लढले पाहिजे तेव्हा कुठे आपले अस्तित्व दिसून येईल असे मत मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड यांनी बैठकीत व्यक्त केले.



### तेलगाव येथे प्रमुख कार्यकर्ता बैठक संपन्न

या बैठकीच्या अनुषंगाने बहुजन समाजातील वेगवेगळ्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली जसे की ऊसतोड कामगार, वेठबिगार, स्थलातरीत मजूर,व तत्सम जातीवर होणारे अन्याय अत्याचार,घरकुल बाबतीत येत असलेल्या समस्या, संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली यावेळी मानवी हक्कअभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ. मिलींद आवाड यांनी प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले

या वेळी कर्मवीर ॲड एकनाथराव आवाड यांच्या पुतळ्यास अभिवादन करून बहुजन समाजातील केलेल्या कामाला उजाळा देत बहुजन समाजाला स्वाभीमानी जिवनमान जगण्यासाठी त्याच्या गायरान जमीनी नावे झाल्या पाहीजेत त्यांचा अर्थीक स्थर वाढला पाहीजे बहुजन समाजावर होणारे अन्याय अत्याचार थाबला पाहीजे यासाठी जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयाकडे मोर्चा,धरणे अदोलनाची भुमीका घेऊन बहुजन समाजाला सविधानीक मार्गाने न्याय मिळवून देण्यासाठी मानवी हक्कअभियानाच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यानी सज्ज राहीले पाहीजे लोकांचे प्रश्न समस्या संदर्भात वेळोवेळी आवाज उठवला पाहिजे कार्यकर्ता ◀◀ पान ३ वर

# माजलगावमध्ये संत रविदास महाराज मंदिर बांधकामाचे उद्घाटन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बायपास रोड लगत छत्रपती नगर येथे संत रविदास महाराज यांच्या मंदिर बांधकामाचे उद्घाटन दि.०७ मार्च शुक्रवार रोजी सकाळी १०:३० वाजता बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

सदरील मंदिराचे भूमिपूजन २०२४ मध्ये सर्व चर्मकार समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी बेसमेंट पर्यंतचे काम सर्व समाजाच्या सहभागातून करण्यात आले असून पुढील संपूर्ण बांधकाम हे गोपीनाथराव खंडागळे (बापू )यांच्या सहभागातून होणार आहे.या बांधकामाचे उद्घाटन बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी नगरसेवक राहुल लंगडे,अरविंद खंडागळे,चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, सत्यनारायण उनवणे,राजेश जाधव,अशोक वाघमारे सर,दिलीपराव सोनवणे,सिताराम सोनवणे,योगेश शिंदे,राधाकिसन भाळशंकर, बाबासाहेब कदम,हरिभाऊ वेताळ,संतोष जाधव, सहदेव खंडागळे,सुभाष कांबळे,आकाश कांबळे,वसंत वाघमारे,श्रीहरी सोनवणे,शहाजी कांबळे,नितीन कांबळे यांची उपस्थिती होती.



# मारवाडी युवा मंचच्या अध्यक्षपदी गिल्डा तर उपाध्यक्ष पटवारी



अंबड । प्रतिनिधी

मारवाडी युवा मंच अंबड यांचा नविन शाखेचा गठन करण्यात आला आहे. यावेळी मारवाडी युवा मंचचे प्रदेशाध्यक्ष कैलास राठी यांच्या उपस्थिती बैठक संपन्न झाली. यावेळी सर्व यांच्या सहमती ने अध्यक्ष गोपाल गिल्डा तर उपाध्यक्ष राम पटवारी यांची निवड करण्यात आली तसेच पुढील कार्यकारणी मध्ये सचिव संतोष जोशी,

कोषाध्यक्ष प्रतीक गिल्डा, गौरव जेथलिया, सह उपाध्यक्ष गौरव लाहोटी, आशिष पाटणी, शुभम जोशी, गौरव लाहोटी, सह सचिव महेश गिल्डा, प्रितम बाकलीवाल, सह कोषाध्यक्ष गौरव जेथलीया, सोशियल मीडिया प्रमुख राहुल अग्रवाल, राम पटवारी, कार्यकारी अध्यक्ष अरुण शर्मा, वृक्षारोपण

अतुल मालू, विवेक गिल्डा, आदित्य सोडाणी, सहयोग दानपत्र टिनुसेठ म जेथलिया, राहुल सोडाणी, प्रतिक व गिल्डा, रक्तदान, कॅन्सर जनजागृती संजय जोशी, संदीप जाजु, देवेन लाहोटी, स्पोर्ट्स महेश गिल्डा, हरेश लाहोटी, गौरव लाहोटी, शाखा विस्तार महेश गिल्डा, हरेश लाहोटी, गौरवलाहोटी, जनसेवा रोहित सोमाणी, कृष्णा राठी, अरुण शर्मा, व्यक्ती विकास – दिपक पाटणी, प्रितम कासलीवाल, अमृत धारा – कैलास राठी, सागर अग्रवाल मारवाडी भाषा विस्तार – रोहित सोमाणी, प्रितम बाकलीवाल को ऑर्डिनेटर आदित्य सोडानी, देवेन लाहोटी, संकेत मंत्री अश्या नियुक्ती करण्यात आल्या.




# मनीषा घुले यांच्या नवचेतना या संस्थेमार्फत हजारो गरजवंतांना मिळतोय आधार

मनीषा घुले यांच्या नवचेतना या सर्वांगीण विकास केंद्राच्या माध्यमातून मागील सोहळा वर्षापासून बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर परभणी, धाराशिव, अहिल्यानगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या गावातील पिढीत निराधार तसेच ऊसतोड मजुरांच्या विकासासाठी, त्यांच्या हक्कासाठी मनीषा घुले नवचेतनाच्या माध्यमातून संघर्ष करत आहेत. तसेच गावोगावी जाऊन महिलांसाठी बचत गटाची निर्मिती करून त्यांच्या माध्यमातून ५५ हजार हून अधिक महिलांना एकत्र



करून स्वतंत्र केज येते बँक सुरू केली या बँकेच्या माध्यमातून ५०० महिलांपेक्षा अधिक महिलांना प्रत्येकी दहा हजार रुपये पासून ते ४० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. तसेच पारधी समाजाच्या २० वस्त्यावर वीस शाळा सुरू केल्या आहेत जेणेकरून पारधी समाज शिक्षण क्षेत्राकडे वळला जाऊ शकतो त्यासाठी स्वतंत्र खोली बांधकाम करून मोफत शिक्षण ह्या संस्थेच्या मार्फत मुलांना देत आहेत. गावोगावी महिला बचत गटांच्या माध्यमातून वार्षिक एक लाख फळ झाडांचे वाटप केले जात आहे अशा या मनीषा घुले यांच्या या चेतना सर्वांगीन विकास संस्थेला आतापर्यंत देश पातळीवरील दोन राज्य पातळीवरील चार असे एकूण २१ पुरस्कार मिळालेले आहेत. आशा महिलांसाठी काम करणाऱ्या या कर्तृत्वाचं नाव आहे मनीषा घुले नावाचेतना संस्थेच्याच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने महिलांमध्ये जगण्याची चेतनाच निर्माण केली आहे. मनीषा घुले यांच्या नवचेतना या संस्थेमार्फत हजारो गरजवंतांना मिळतोय आधार केज तालुक्यातील बेलगाव सारख्या छोट्याशा गावात जन्म झालेल्या मनीषा घुले ह्या आज गोरगरीब पीडित निराधार महिलांसाठी नवचेतना ◀◀ पान ३ वर

केज – दुर्गादास लांब
९७६५५०६०५०

### ३०० गावात चालते काम

मागील सोळा वर्षाच्या काळामध्ये मनीषा घुले यांनी आपल्या संस्थेचे काम ३०० गावांमध्ये चालू केले आहे यामध्ये जवळपास ५५ हजार महिला नवचेतना ग्रुप सोबत जोडले आहेत या सर्व कामासाठी नवचेतना सर्वांगीण विकास केंद्राचे सदस्य व सर्व टीम याचा सहभाग आहे ३०० गावातील महिलांना तसेच शेतकरी आत्महत्या ग्रस्त शेतकरी यांचे कुटुंबातील सदस्य यांच्यासाठी पुढाकार घेवून वेगवेगळ्या योजनेतून लाभ मिळवून दिले आहे.

### नवचेतनाचा चार जिल्ह्यात विस्तार

२००८ मध्ये सुरू झालेली ही संस्था झपाट्याने आपले कार्य वाढवत असल्याचं पहायला दिसत आहे आज घडीला नवचेतना या संस्थेचे बीड, परभणी, अहिल्यानगर, धाराशिव या जिल्ह्यातील सहा हजार बचत गट सक्रिय असलेचे पहायला मिळत आहेत या बचत गटामार्फत महिलांना भांडवल उपलब्ध करून दिले जाते तसेच मार्केट सपोर्ट देखील दिला जातो ज्यामुळे महिलांना आधार मिळतो

### २० पारधी वस्तीवर पोहोचविले शिक्षण

केज तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाडी वस्तीवर पारधी समाज राहतो पारधी समाजातील मुले शिक्षणापासून वंचित राहतात ही बाब लक्षात घेऊन मनीषा घुले यांनी नवचेतना सर्वांगीण विकास या संस्थेच्या माध्यमातून वीस पारधी वस्तीवर स्वतंत्र शाळा खोली बांधून त्यांना मोफत शिक्षण देण्याचे काम चालू केले आहे










This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# प्रवाशांच्या सतर्कतेमुळे कर्जत स्थानकात अपघात टळला; तातडीने करण्यात आले उपचार


कर्जत स्थानकात सहा मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता एक थरारक प्रसंग घडला, जिथे दोन प्रवाशांच्या सतर्कतेमुळे एका प्रवाशाचा जीव वाचला. पुणे-इंदूर एक्सप्रेस कर्जत स्थानकात पोहोचली असता सूर्यकांत गुप्ता नावाचे प्रवासी ट्रेनमधून उतरले. स्टेशनवर उतरल्यावर ते प्लॅटफॉर्मवर पुढे चालत गेले. त्याच वेळी ट्रेन कल्याणकडे निघत होती. या दरम्यान, एक प्रवासी गाडीत चढण्याचा प्रयत्न करत असताना संतुलन गमावून ट्रेन आणि प्लॅटफॉर्मच्या मध्ये सापडला. सुदैवाने, त्याने ट्रेनच्या दरवाज्यावरील हँडल घट्ट पकडले होते, त्यामुळे तो फरफटत पुढे गेला, पण पूर्णतः खाली पडला नाही.




यावेळी सूर्यकांत गुप्ता यांनी प्रसंगावधान दाखवत त्या प्रवाशाला तातडीने पकडले आणि वर खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांची शक्ती अपुरी पडू लागली. हे पाहून कर्जत स्थानकातील एका हॉकरने धाव घेतली आणि त्याने देखील दोन्ही हातांनी प्रवाशाला ओढून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दोघांनी मिळून अथक प्रयत्न केल्यानंतर अखेर त्या प्रवाशाला सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळाले. मात्र, या अपघातात तो गंभीररीत्या जखमी झाला होता. त्याच्या पाठीवर मोठ्या प्रमाणावर खरचटले होते आणि तो मानसिकरित्या हादरला होता.

ही घटना घडल्यानंतर स्टेशनवरील कर्मचाऱ्यांनी तातडीने मदत केली आणि परिस्थिती हाताळण्यास पुढाकार घेतला. जखमी प्रवासी विजय शिरसाट, जो पुण्यातील काळेवाडीचा रहिवासी आहे, त्याला तत्काळ प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर नेण्यात आले. अपघातामुळे तो मोठ्या प्रमाणात घाबरलेला होता आणि शारीरिकदृष्ट्याही काही प्रमाणात अशक्त झाला होता. स्थानकातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर त्वरित प्राथमिक उपचार सुरू केले आणि त्याला आवश्यक ती वैद्यकीय मदत दिली. त्याच्या पाठीवर आणि हातावर खरचटल्याने वेदना जाणवत होत्या, मात्र सुदैवाने कोणतीही गंभीर दुखापत झाली नव्हती.

स्थानकातील कर्मचाऱ्यांनी त्याला धीर दिला आणि शांत करण्याचा प्रयत्न केला. प्रवाशांच्या सहकार्यामुळे मोठा अनर्थ टळला होता, याची जाणीव विजय शिरसाट यांना होत होती, त्यामुळे त्यांनीही सर्व मदत करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी त्याच्या पुढील प्रवासाची व्यवस्था केली आणि त्याला आवश्यक मलमपट्टी करून पुन्हा प्रवास करण्यासाठी तयार केले. स्टेशनवरील अधिकाऱ्यांनीही त्याच्या सुरक्षिततेची काळजी घेतली आणि पुढील मार्गदर्शन करून त्याच्यासाठी प्रवासाचे तिकीटही काढून दिले.या संपूर्ण प्रसंगातून प्रवाशांच्या सतर्कतेचे आणि प्रसंगावधानाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. वेळेवर मदत मिळाल्याने एक अनमोल जीव वाचला. सार्वजनिक ठिकाणी प्रवास करताना प्रत्येकाने सावधानता बाळगणे आणि इतर प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः गाडीत चढताना किंवा उतरताना काळजी घेणे आवश्यक आहे, कारण थोडीशी बेफिकिरी मोठ्या अपघातास कारणीभूत ठरू शकते. यासोबतच, संकटाच्या क्षणी इतरांना मदत करण्याची तयारी असली पाहिजे, याचेही महत्त्व या घटनेतून अधोरेखित होते. कर्जत स्थानकातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि प्रवाशांनी दाखवलेली माणुसकी निश्चितच कौतुकास्पद आहे.



# पुण्यात माल वाहतूक वाहनाची रिक्षाला धडक; चालकाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

मालवाहतूक करणाऱ्या भरधाव वाहनाच्या धडकेत रिक्षाचालकाचा मृत्यू झाल्याची घटना खडकवासला परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी चालकावर गुन्हा दाखल केला. दीपक छबू वाळुंजकर (वय ३५, रा. बहुली, ता. हवेली, जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. याप्रकरणी मालवाहू (पिकअप) वाहनाचा चालक धनराज पाटील (रा. किरकटवाडी, खडकवासला) याच्यावर गुन्हा दाखल केला. याबाबत सहायक निरीक्षक प्रसाद जोशी यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, वाळुंजकर हे मंगळवारी (४ मार्च) सायंकाळी पाचच्या सुमारास खडकवासला परिसरातील कुडजे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याने रिक्षातून निघाले होते. तेव्हा भरधाव वाहनाने त्यांच्या रिक्षाला धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता वाहनचालक पाटील पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या रिक्षाचालक वाळुंजकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले होते. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. उपनिरीक्षक मुकेश कुरेवाड तपास करत आहेत.

# भरदुपारी सहकारनगरमध्ये धाडसी चोरी; महिलेकडील एक लाखाची रोकड पळवली

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सहकारनगर भागात भरदुपारी दुचाकीचालक महिलेजवळील १ लाख रुपयांची रोकड असलेली पिशवी हिसकावून चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला. याप्रकरणी ४६ वर्षीय महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार दुचाकीस्वार चोरट्यांवर गुन्हा नोंद केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार महिला तळजाई वसाहत भागात राहायला आहेत. त्या बुधवारी (५ मार्च) दुपारी साडेबाराच्या सुमारास सहकारनगर भागातून दुचाकीवरुन मुलासोबत निघाल्या होत्या. महिलेने बँकेतून एक लाखांची रोकड काढून पिशवीत ठेवली होती. विद्या विकास शाळेजवळ पाठिमागून दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या हातातील रोकड असलेली पिशवी हिसकावून पोबारा केला. पिशवी हिसकावताच महिलेने आरडाओरडा केला. चोरटे भरधाव वेगात पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच सहकारनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राहुल गौड यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासले आहे. सहायक निरीक्षक सागर पाटील तपास करत आहेत.

शहरात महिलांकडील दागिने हिसकावणे, तसेच पादचाऱ्यांकडील मोबाइल हिसकावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या वर्षी अशा प्रकारचे १८० हून जास्त गुन्हे दाखल झाले होते.

महिलेकडील अडीच लाखांचे दागिने चोरी

पादचारी महिलेकडील अडीच लाखांचे सोन्याचे दागिन चोरून नेल्याची घटना नगर रस्त्यावरील वाघोली भागात घडली आहे. याबाबत एका महिलेने वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला कात्रज-कोंढवा रस्त्यावरील एका सोसायटीत राहायला आहेत. त्या मंगळवारी वाघोली भागात गेल्या होत्या. मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास त्या ढोले पाटील महाविद्यालयाजवळ थांबल्या होत्या. दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील अडीच लाखांचे दागिने चोरुन नेले. पोलीस उपनिरीक्षक वैजीनाथ केदार तपास करत आहेत.

# पुण्यातील नदी प्रदूषणाची पर्यावरण मंत्र्यांकडून गंभीर दखल; म्हणाले कोणतीही तडजोड केली जाणार नाही

पिंपरी: पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील मुळा-मुठा, पवना आणि इंद्रायणी या नद्यांमध्ये रासायनमिश्रीत सांडपाणी प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने पर्यावरण आणि आरोग्य धोक्यात आल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडत प्रदूषण रोखण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे, असा थेट सवाल केला.



त्याची गंभीर दखल घेत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही उद्योगाला प्रक्रिया न करता थेट रासायनमिश्रीत सांडपाणी नदीत सोडण्याची मुभा दिली जाणार नाही. अशा उद्योगांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच, कोणत्याही विशिष्ट प्रकरणाची तक्रार आल्यास तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल.

नद्यांमधील वाढते प्रदूषण थांबवण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (चझउइ) काय भूमिका बजावणार, तसेच दोषी उद्योगांवर कारवाई कधी केली जाणार, यावर आमदार जगताप यांनी सरकारला जाब विचारला. यावर मंत्री पंकजा मुंडे यांनी कठोर भूमिका घेत पर्यावरण रक्षणाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

नद्यांच्या शुद्धतेसाठी मैला जलशुद्धीकरण प्रकल्प अधिक सक्षम करण्याची गरज असून, महानगरपालिका आणि औद्योगिक वसाहतींनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी सूचित केले. नदी प्रदूषणास जबाबदार असलेल्या कंपन्या आणि व्यवसायांवर लवकरच ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासनही मुंडे यांनी दिले.

नदीकाठ सुधार योजनेसंदर्भात खासदार मेधा कुलकर्णींचा इशारा

राम नदी आणि मुळा - मुठा नदीकाठ सुधार योजनेसंदर्भात विभागीय आयुक्त डॉ. महेश पुलकुंडवार यांच्याबरोबर लवकरच संयुक्त बैठक होणार आहे, अशी माहिती राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी दिली आहे. पुण्यातील नदी सुधार योजनेच्या ४४ किलोमीटर कामातील राम नदी - मुळा नदी संगम येथील जागेची संयुक्त पाहणी खासदार कुलकर्णी यांनी केली. यावेळी महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, जीवित नदी संस्थेचे पुणे रिव्हर रिव्हर्सल संस्थेचे शैलजा देशपांडे व अन्य पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


नदीचे पात्र कमी होऊन मानव निर्मित; नदीकाठ सुधार योजनेसंदर्भात खासदार मेधा कुलकर्णींचा इशारा

पुण्यात केंद्राच्या माध्यमातून व राज्य शासनाच्या सहकार्याने नदी सुधार प्रकल्प राबवला जात असून ४४ किलोमीटरच्या एकूण कामासाठी सुमारे ४७०० कोटी रुपये निधी आवश्यक आहे. या कामाचा एकंदरीत विकास आराखडा झाला असून यात काही त्रुटी आहेत. शिवाय बंडगार्डन येथील कामादरम्यान नदीत भराव टाकून नदीचे पात्र कमी करण्यात आले आहे व २०० वर्षांचे जुनी वृक्षांची कत्तल केली जात आहे. याविषयी केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे तक्रार केल्याची माहिती खासदार कुलकर्णी यांनी केली.

# अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून वारंवार छेडछाड; वडिलांनाही दिली धमकी, पोलिसांत तक्रार येताच

दौंड : सध्या सर्वत्र दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा सुरू आहे. त्यामुळे पेपर झाल्यानंतर परीक्षा केंद्राबाहेर रोडरोमिओंनी धुमाकूळ घातला आहे. शहरातील एका परीक्षा केंद्राबाहेर अल्पवयीन विद्यार्थिनीची छेडछाड करून वारंवार तिचा पाठलाग करण्यात आला. त्यामध्ये तिला मानसिक त्रास दिल्याची तसेच एवढ्यावरच न थांबता रोडरोमिओंनी तिच्या वडिलांना मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.

दौंड पोलिसांनी सदरचे प्रकरण गांभीर्याने घेत दोन युवकांविरोधात पोक्सो कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करून मुख्य आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी विद्यार्थिनीच्या आईने फिर्याद दिली. दौंड पोलिसांनी अरबाज हुसेन शेख (रा.कस्तान चाळ, दौंड) व अनोळखी साथीदार यांच्याविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ फेब्रुवारीला पेपर झाल्यानंतर विद्यार्थिनी भेदरलेल्या अवस्थेत रडतच घरी गेली. आईने तिची विचारपूस केली असता तिने सांगितले की, पेपर सुटल्यानंतर ती घरी येत असताना आरोपी अरबाजने दुचाकीवरून तिचा पाठलाग केला. तिच्या अंगाजवळून दुचाकी नेत तिला कट




मारला. ती घराजवळ आली असता अरबाजने तिला फोन कर असा इशारा केला व तो निघून गेला.

शाळा बंद करतील

घरचे आपली शाळा बंद करतील, या भीतीने ती गप्प होती. मात्र, त्रास असह्य झाल्याने तिने आईला सांगितले की, अरबाज वारंवार तिचा पाठलाग करून त्रास देतो. घडलेला सर्व प्रकार आईने मुलीच्या वडिलांना सांगितला. हे सर्व होत असताना फक्त मुलीची बाजू असल्याने ते सुद्धा शांत राहिले. नंतर विद्यार्थिनी व आई दोघेच घरी असताना अरबाज पुन्हा त्यांच्या घरासमोर आला व सिगारेट ओढत वाईट नजरेने मुलीकडे पाहात उभा राहिला. त्यामुळे दोघेही घरात निघून गेल्या. त्यांनी हा प्रकार सुद्धा आपल्या वडिलांना सांगितला. तरीही सगळे शांतच राहिले.

१ मार्चला पुन्हा

१ मार्च रोजी पावणे दहाच्या दरम्यान येथील पोस्ट ऑफिस परिसरात अरबाज दुचाकीवर आपल्या साथीदारासोबत आला व त्यांनी मुलीच्या वडिलांना शिवीगाळ केली. आपल्याबरोबर असणाऱ्या साथीदाराला त्याने त्यांना मारण्यास सांगितले. तेव्हा याला येथे नको, दुसरीकडे मारू असे साथीदाराने त्याला सांगितले. या प्रसंगानंतर मुलीचे वडील भीतीपोटी घरी गेले. अरबाजकडून कुटुंबाला होणारा त्रास असह्य झाल्याने त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रुपेश कदम करत आहेत.

# महिला दिन विशेष : युवक काँग्रेसकडून महिला सह जिल्हा निबंधक व सह दुय्यम निबंधकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान

पुणे : आठ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. नारी शक्तीचा सन्मान करण्याचा, महिलांच्या कार्यकर्तृत्वाला सलाम करण्याचा दिवस म्हणून महिला दिनाच्या औचित्याने जगभरात महिलांच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात.



पुणे सह जिल्हा निबंधक वर्ग एकचे संतोष हिंगाणे व सह जिल्हा निबंधक वर्ग दोनचे मंगेश खामकर यांच्या पुढाकाराने महिला अधिकाऱ्यांचा सन्मान म्हणून शहरातील सर्व दुय्यम निबंधक हवेली क्र.१ ते २७ या २७ कार्यालयांचा पदभार दि. ०७/०३/२०२५ रोजी (दि. ०८/०३/२०२५ सुट्टी असल्यामुळे) सर्व महिला अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला होता.

दस्त नोंदणीचे कामकाज शासन आणि नागरिक यांच्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. असे जबाबदारीचे काम महिला समर्थपणे पेलू शकतात हे या निमित्ताने दिसून आले. शुक्रवार दि. ०७/०३/२०२५ रोजी शहरातील सर्व २७ दुय्यम निबंधक, तसेच विवाह अधिकारी या पदांचा कार्यभार महिला अधिकारी यांचेकडे देण्यात आला होता.तसेच, सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) या पदाचा कार्यभार श्रीमती.संगिता जाधव पठारे यांच्याकडे तर, सह जिल्हा निबंधक (वर्ग-२) या पदाचा कार्यभार श्रीमती.राजश्री खटके यांच्याकडे एक दिवसासाठी सोपवण्यात आला होता.

महिला दिनाच्या निमित्ताने पदभार प्राप्त पुणे शहरातील सर्व महिला दुय्यम निबंधक व सह जिल्हा निबंधक महिला अधिकाऱ्यांचा पुषगुच्छ देऊन युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी सत्कार केला व शुभेच्छा दिल्या.

सह जिल्हा निबंधक पुणे शहर कार्यालयाने मागील वर्षीच्या महिलादिनी देखील हा उपक्रम राबविला होता. हा उपक्रम खरोखरचं स्तुत्य आहे. राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे, राज्याचे नोंदणी उप महानिरीक्षक उदयराज चव्हाण व पुणे विभागाचे नोंदणी उपमहानिरीक्षक दिपक सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चांगला कार्यक्रम झाल्याचे दिसून आले. पुढील महिलादिनी पुणे शहराप्रमाणे राज्यभरात या प्रकारचा उपक्रम राबवून महिला अधिकाऱ्यांचा सन्मान व्हावा. महिला दिनाच्या जगभरातील सर्व माता भगिनींना शुभेच्छा, असे मत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील, यांनी व्यक्त केले आहे.

# शासकीय नोकरीच्या आमिषाने एकाची फसवणूक; तब्बल ५ लाखांना घातला गंडा

पुणे : राज्यात फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. मुलाला शासकीय नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एकाकडून पाच लाख रुपये घेऊन त्यांच्या मुलाला नोकरी न लावता फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी विशाल किसनराव साळी (वय ५२, रा. गणेशनगर, वडगाव शेरी) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, विजय मुरलीधर जाधव (वय ४५, रा. येरवडा) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांच्या माहितीनुसार, साळी यांची जाधव याच्याशी एका त्रयस्त व्यक्तीमार्फत मार्च २०२३ मध्ये ओळख झाली होती. तेव्हा त्याने साळी यांना त्यांच्या मुलाला शासकीय कार्यालयात नोकरी लावून देतो, असे आमिष दाखविले. नंतर त्यांच्याकडून नोकरी लावण्याच्या कारणाने वेळोवेळी पाच लाख रुपये घेतले. पैसे घेतल्यानंतर देखील मुलाला नोकरी लागली नाही. साळी यांनी त्याच्याकडे विचारणा केली. तेव्हा त्याने उडवाउडवीच उत्तरे दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत माने अधिक तपास करत आहेत.

लष्करात भरती करण्याच्या बहाण्याने फसवणूक

गेल्या काही दिवसाखाली महाराष्ट्रातील मुलांना लष्करात भरती करण्याचे आमिष दाखवून प्रत्येक उमेदवाराकडून प्रत्येकी तीन लाख रुपये घेऊन लष्करात नोकरी लावतो म्हणून फसवणूक करणाऱ्या तोतया लष्करी जवानावर बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिलिटरी इंटेलिजन्स आणि वन गार्डन पोलीस यांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. नितीन बालाजी सुर्यवंशी (रा.मु. पो. हेळंब, तालुका देवणी, जिल्हा लातुर) असे बोगस जवानांचे नाव आहे. याबाबत भरत रमेश महाटे (वय २३, रा. नागराळ, तालुका - मुखेड, जिल्हा नांदेड गोंधळेनगर, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार १३ ऑगस्ट २०२४ रोजी ते आज रोजी पर्यंत सदर्न कमांड कैंटीन व सब एरीया कैंटीन कॅंप परिसर येथे घडला आहे. यामध्ये फिर्यादीची १ लाख ७५ हजारांची फसवणूक करण्यात आली.

कोथरुडमधील व्यक्तीला ३० लाखाला गंडा

कोथरूड भागातील एका नोकरदार व्यक्तीला सायबर चोरट्यांनी टास्क तसेच युट्यूबला लाईक्स मिळवून देण्यासाठी तसेच ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी (ऑनलाइन टास्क) असल्याच्या आमिषाने २९ लाख ६३ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर कोथरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत ५३ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने तपास करत आहेत.

# पुणेकरांचा मेट्रोला मिळतोय उदंड प्रतिसाद; दिवसाला १.६० लाख नागरिक करताहेत मेट्रोने प्रवास

पुणे : पुणे मेट्रोच्या सेवेला तीन वर्ष पूर्ण होत आहे. सुमारे एक लाख ६० हजार प्रवासी प्रति दिन मेट्रोने प्रवास करत आहेत. यामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पुणेकरांना चांगला पर्याय उपलब्ध झाल्याचे स्पष्ट झाले आहे.



पुण्यात ६ मार्च २०२२ रोजी पहिल्यांदा मेट्रो धावली होती. टप्प्याटप्प्याने सेवा वाढविली गेली. मेट्रो मार्गांच्या नेटवर्कचा विस्तार झाल्याने पुणेकरांसाठी एक वेगवान, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक वाहतूक पर्याय उपलब्ध झाला आहे. पुणे मेट्रोचे ६ मार्च २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केले होते. यानंतर दोन प्रारंभिक मार्गांसह, पीसीएमसी ते फुगेवाडी आणि वनाज ते गरवारे कॉलेज या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू झाली. त्यानंतर, मेट्रो नेटवर्कचा पुढे विस्तारित होत गेले.

पुणे मेट्रोच्या सुरुवातीच्या काळात २१,४७,७५७ प्रवासी होते (मार्च २०२२ ते जुलै २०२३ पर्यंत). १ ऑगस्ट २०२३ रोजी फुगेवाडी ते जिल्हा न्यायालय, जिल्हा न्यायालय ते रूबी हॉल क्लिनिक आणि गरवारे कॉलेज ते जिल्हा न्यायालय या मार्गिकांच्या उद्घाटनानंतर प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आणि १,२३,२०,०६७ झाली.

प्रवासी संख्या पोहोचली १६९६९५५४ पर्यंत

रूबी हॉल क्लिनिक ते रामवाडी या विस्तारामुळे प्रवासी संख्या १,६९,६९,५५४ पर्यंत पोहोचली. २९ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गिकांच्या उद्घाटनाने ६ मार्च २०२२ ते ५ मार्च २०२५ या कालावधीत एकूण प्रवासी संख्या ५,९८,७६,७४३ झाली. त्याचबरोबर एकूण महसूल ९३,००,०४,२६८ रुपये झाला. पुणे मेट्रोची दररोजची सरासरी प्रवासी संख्या सुमारे १,६०,००० आहे.